## – प्रकरण पहिले –

## – श्री. ना. पेंडसे यांच्या वाड्.मयाचा थोडक्यात आढावा –

**श्री. नां. चा परिचय :-**

श्री. ना. उर्फ श्रीपाद नारायण पेंडसे यांचा जन्म 5 जानेवारी 1913 मध्ये झाला. 'शिरू'' हया नावाने कुटुंबात व मित्रमंडळात परिचित होते. रत्नागिरी जिल्हयातील 'मुर्डी' हे त्यांचे गाव. मुर्डीमध्ये पेंडशांची घरे जास्त होती. तेथील लोक हे गाव रँगलर परांजपेचे म्हणून ओळखत. पेंडसे घराणे खोती परंपरेतील वादातील दिसते. कुटुंबाच्या अनेक शाखा पाहावयास मिळतात. पहिली शाखा गणेश नारायण पेंडसे हे शास्त्री किर्तनकार म्हणून प्रसिद्ध खोती करणारे. त्यांना सहा मुलगे व दोन मुली होत्या. त्यामध्ये सर्वात लहान नारायण गणेश पेंडसे पंचवीस वर्षाचे झाले तरी आपण काय करणार हे उमजत नव्हते. 'अप्पा दामले' यांची मुलगी 'अंबू' बरोबर नारायण गणेश यांचे लग्न झाले. 'अंबू'ची 'अन्नपूर्णा' झाली.

नारायण गणेश यांना नऊ अपत्ये झाली. त्यामध्ये 'श्रीपाद' नारायण हा थोरला. श्रीपाद वर वडिलांच्या मायेचा ओलावा नव्हता. तो बहिणींच्यावर होता. मुर्डीला नोठा आधार 'काशीताई'चा होता. मुरूडचा 'वासू दामले' सोडला तर श्री.नां.च्या शैक्षणिक जीवनामध्ये ते एकाकीच राहिले. त्यांच्या मनामध्ये मात्र गॅडणीच्या चर्चने, बाजारातील मारूतीचे देऊळ, वाचनालय, मशीद, मराठी शाळा, डेरेदार आंब्याचे झाड, ढोलीत साचणारे पावसाचे पाणी, भुंडी म्हैस यावर श्री.नां.चा विलक्षण जीव व नाते होते.

श्री.नां. बंडया (तात्या दामले) मामाबरोबर शिक्षणासाठी मुंबईला गेले. मात्र कोकणी 'रांडेच्या' ने त्रास दिला. तेव्हा त्यांना 'दापोली' बरी वाटू लागली. श्री.नां.ना तात्यांनी शिक्षणाबरोबर इतर उद्योग शिकण्यासाठी पाठवले. मात्र श्री.ना. तबला व पेन्टींग तीन वर्षे शिकले. मात्र त्याचा पुढे काही उपयोग झाला नाही.

श्री.ना. यांचे मित्र वामन व गणू भिडे होते. गणू व श्री.ना. यांनी 'बालोत्कर्ष' मासिक काढले. श्री.ना. चौथीत असताना त्यांना रा.गो. अक्षीकर हे वर्गशिक्षक लाभले. त्यांनी श्री.ना.ना डायरी लिहीण्यास सांगितले. श्री.ना. रोजनिशी लिहू लागले. त्यांना वृत्तपत्र वाचनाची आवड निर्माण झाली. भाला, केसरी, विविध वृत्त या नियतकालीकांचे वाचन सुरू झाले. चौथी पास झाल्यावर श्री.ना. यांनी आयुष्यातील पहिला लेख लिहीला. त्यामध्ये 'भाऊचा धक्का ते हर्णेबंदर प्रवासाचे ते वर्णन होते' त्यातूनच 'अध्यात्माची' आवड. उन्हाळयाच्या सुट्टीमध्ये पुण्याला चुलते

प्राध्यापक होते. त्यांच्याकडे गेले. तिथे 'केसरी'चे संपादक तात्यासाहेब केळकर व राम गणेश गडकरी या साहित्यीकांकडे चुलत्यांच्याबरोबर गेले. 'एकच प्याला' व ना.सी. फडके यांची 'जादुगार' वाचली. हया कादंबरीने श्री.ना.ना भुरळच घातली.

श्री.ना. मॅट्रीक झाल्यावर विल्सन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. संस्कृत जनत नव्हते. म्हणून फ्रेंच भाषेचा अभ्यास केला. घरातील सर्वांचा विरोध असूनही ठाण्याच्या शाळेमध्ये फ्रेंच शिक्षकाची नोकरी अक्षीकरांच्या सहाय्याने दरमहा चाळीस रूपये पगाराची धरली. 1938 मध्ये श्री.ना. इन्टरसायन्सला पास झाले. मात्र 1937 मध्ये नारायण गणेश यांचा मृत्यू झाला. त्यामुळे सर्व कौटुंबिक जबाबदारी त्यांच्यावर पडली. श्री.ना. नी प्रौढ आयुष्यात 1936 मध्ये 'आप्पाशास्त्री' व 1937 मध्ये 'जीवनकला' लेख लिहीले. 1933 ते 1937 मध्ये साहित्याचे आकर्षण झाले. श्री.ना. नी बी.एस्सी.ला प्रवेश घेतला. तो जून, जुलैमध्ये 'झारापकर' मासिकामध्ये 'आप्पाशास्त्री', 'जगुतात्या किडमिडे', 'काशीताई', 'आमचे मास्तर' व 'मनोहर' मासिकामध्ये 'बापूकाका सामल' हे लेख प्रसिद्ध झाले. श्री.ना. प्रसिद्धीच्या उंबरठयावर आले. 'आमचे मास्तर' व 'काशीताई' बद्धल श्री.ना. म्हणतात. "हया दोन व्यक्तींसंबंधी मला बरेच काही दिसतं आहे; पण हातात नीट गवसत नाही."[1] हयाच व्यक्ती दहा वर्षानंतर श्री.ना.ना सापडतात. हिंदू–मुस्लीम समाजावर 'अमरज्योती' ही कथा 1938 मध्ये श्री.ना.नी लिहीली. 1940 मध्ये परिक्षेला बसले नाहीत. साहित्याच्या उताराला घरची कौटुंबिक परिस्थिती जबाबदार होती. कुटुंबाला तात्या दामलेंचा आधार होता. पण ते निवृत्तीच्या विचारात होते. श्री.ना. एप्रिलमध्ये सांगलीला गेले व 'मे' मध्ये मुंबईला सर्व कुटुंब घेऊन आले. माटुंग्याच्या गोपीटॅंकच्या शाळेत बदली करून घेतली. आणि गोखलेवाडीत स्थायीक झाले. पुढची पंचवीस वर्षे. मात्र सुदैवाने घरातील आजारपण कमी झाले होते.

श्री.ना. यांचे 'खडका वरील हिरवळ' हे पुस्तक के.र. काशिकरांच्या 'आदर्श विद्यालय' या संस्थेत छापून आले. 1941 मध्ये बी.एस्सी.साठी निकराचा प्रयत्न करूनही असफल झाले. 1941–42 हे वर्ष सुरू झाले. त्यावेळी कौटुंबिक घडामोडींना तोंड दयावे लागले. अल्पबचतीचा प्रयत्न सुरू झाला. "आपल्याला भाजी परवडत नाही, आमटीचा एक ढक्कू करीत चला."[2] यातून श्री.ना.ची प्रापंचिक काटकसर दिसते. 1942 मध्ये बी.एस्सी. पास झाले. मात्र इंदूच्या मृत्यूने डीग्रीकडे ढुंकूनही पाहिले नाही.

श्री. ना. डॉ.द.वा. बाळ यांच्या मदतीने 1942 मध्ये बेस्टमध्ये नोकरीस लागले. लग्नाची जबाबदारी आली. मात्र त्यांना कौटुंबिक जबाबदारी सांभाळणारी मुलगी हवी होती ती त्यांना मिळाली. सांगलीची कुमारी कमल नारायण मराठे हिच्याशी 14 फेब्रुवारी 1943 रोजी विवाह झाला.

मात्र लग्नानंतर मौज करता आली नाही. पुढे निजानंदला चहाचा धंदा काढून दिला. निजानंदची चिकाटी असूनही अपयश आले. घराचे भाडेही त्यामध्ये गेले. त्यामुळे घरमालकाची नोटीस आली. "तीन महिन्यांचे तुंबलेले भाडे ताबडतोब भरा; नाही तर खोली खाली करा."[3] कौटुंबिक जबाबदारी लक्षात घेऊन कमलताई यांनी मुंबई सरकारच्या फायनान्स डिपार्टमेंटमध्ये 2 नोव्हेंबर 1943 मध्ये नोकरीस राहिल्या. कुटुंबास आता दोघांचा पगार होता. मात्र श्री.ना. आजारी पडले. ते सहा महिने बिनपगारी होते. सर्व कुटुंब कमलताईच चालवित होत्या. त्यामध्ये त्यांना त्रास होत होता. तो त्यांनी श्री.ना. ना सांगितला. तेव्हा त्यांनी श्री.ना.ना सांगितला. तेंव्हा श्री.ना.चे उत्तर हादरा देणारे वाटते. "कमल हया घडीला तुला देण्यासारखं घटस्फोटाखेरीज माझ्याकडे अन्य कांही नाही."[4]

श्री.ना. आजारातून सरळ झाले. नोकरीस गेले. सिनेमासृष्टीचे वेड लागले. त्यात अपयशी ठरले. निजानंद सत्याग्रहामध्ये सामील झाला. त्यातच द्रौपदी व वत्सला यांच्या मृत्यूने दु:ख झाले. मात्र श्री.ना. येईल त्या प्रसंगाला हसतमुखाने तोंड देत होते. प्रसिद्धीच्या लाटेत शिरले नाहीत. दारिद्र्यामध्ये एकाकी राहिले. स्वत:मधल्या कलावंतामध्ये रमले. तेथील माती, माणसे, खडक, पाणी, आकाश, हिरवे वैभव, अगदी कोकणच्या काटयामध्ये सुद्धा ते रमले. त्यांनी माणसावर प्रेम करावे तसेच कोकणवर प्रेम केले. हया प्रेमानेच त्यांनी मुंबई सोडून जालगावला स्थायिक झाले.

श्री.ना.ची स्मरणशक्ती जबरदस्त अशी आहे. त्यांच्या बालपणीच्या घटना त्यांना बारीक सारीक अशा आठवतात. चौथीत असलेल्या वेळच्या पहिल्या लेखापासून ते 'एक होती आजी' या कादंबरी पर्यंत स्मृती विश्वाचाच वापर केला. हया स्मरणशक्तीने त्यांच्या जीवनाच्या वेदना जीवंत ठेवल्या. त्यांच्या स्मरणातून हिरवेपण हरवले नव्हते. ते आजही साहित्यात उमटत आहे. साहित्याच्या चींतनाने त्यांचे जीवनच झपाटून टाकले होते. त्याचे श्रेय त्यांना फार उशीरा मिळाले. 'खडकावरील हिरवळ' पासून पुढे अनेक प्रकारचे साहित्य झळकू लागले. श्री.ना.ना ट्रॅव्हलिंग फेलोशिपने जगाच्या प्रवासाला गेले. फेलोशिपचा पैसा त्यांनी ऋणमुक्तीसाठी वापरला. मात्र साहित्यात ते कायमचे गुरफटून राहिले. हिरवळ कायमची राहिली. 'गारंबीचा बापू' पासून साहित्यीक मित्र वाढू लागले. त्यांना रक्ताच्या नात्याने जोडलेले नवीन सगेसोयरे मिळाले.

श्री.ना. 1 ऑक्टोंबर 1954 मध्ये दिल्लीला साहित्य-संमेलनास गेले. 9 मार्च 1955 ला 'रॉकफेलर फाऊंडेशन'ची फेलोशिप मीळाली. ती मिळविणारे श्री.ना. हे पहिलेच लेखक असावेत.

15 एप्रिल 1955 ला ते जगप्रवासासाठी बाहेर पडले. माघारी आल्यानंतर 'लोकसत्ते'तून प्रवासाचे वर्णन केले. त्याचवेळी 'यशोदा' कादंबरीचा जन्म होत होता.

श्री.ना.ना बेस्ट कंपनीकडे भरपूर पगाराची नोकरी चालून आली. मात्र ती त्यांनी ठोकरली. त्याचे कारण त्यांना फक्त साहित्याकडेच वळायचे होते. 24.02.1994 मध्ये त्यांच्या 'रथचक्र' या कादंबरीस 'साहित्य अकादमी' पारितोषिक मिळाले. मात्र त्यांनी बेस्टची नोकरी सोडली नाही. 1960 मध्ये 'पब्लिक रिलेशन्स डिपार्टमेंट' मध्ये मिळालेली बढती स्विकारली आणि ते त्याच हुद्‌यावर 1968 मध्ये सेवानिवृत्त झाले.

श्री.ना. 28 डिसेंबर 1972 ला साठ वर्षाचे झाले. त्यांच्या भावंडांनी त्यांची साठी साजरी केली. पण त्यात ते रमले नाहीत. ते रंगले, रमले ते त्यांच्या साहित्यामध्ये.

**श्री.नां. च्या वाङ्‌मयीन लेखनाचा आढावा :–**

श्री.ना. यांनी लेखन करताना कलेला महत्व दिले आहे. कारण ती जीवनापासूनच स्फुर्ती घेते. त्यांनी अनुभवलेली सुखदु:खे मनाची तडफड बेहोशी यामुळेच त्यांच्या लेखनाने सुरूवात केलेली आहे. त्यांनी कलेचे महत्व स्पष्ट केले आहे. मराठी कादंबरी मधील कुसुमावती देशपांडे यांचा अभिप्राय महत्वाचा ठरतो." सौंदर्याचे दर्शन घडवून जीवननिष्ठा वाढीस लावणे आणि असुंदराचे दर्शन घडवून मानवाचे अपूर्णत्व दृष्टोत्पत्तीस आणणें हेच कलेचे एकमेव कार्य होय."[5]

श्री.नां.च्या लेखनाला सुरूवात झाली ते पाहणे महत्वाचे ठरते आणि तीच त्यांच्या साहित्याची खरी गंगोत्री ठरते. श्री.ना. यांचे 1941 मध्ये 'खडकावरील हिरवळ' हे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि या हिरवळीनेच त्यांना ख–या अर्थाने साहित्यीक बनविले.

**'खडकावरील हिरवळ' :–**

श्री.ना.चे 'खडकावरील हिरवळ' हे व्यक्ति चित्रणांचे छोटेसे पण सुबक पुस्तक इ.स. 1941 मध्ये के.र. काशीकरांच्या 'आदर्श विद्यालय' या संस्थेतून प्रसिद्ध झाले. यामध्ये नऊ व्यक्तिचित्रे व एक निबंध असे दहा लेख आहेत. प्रस्तावना ग.त्र्यं. माडखोलकर यांची मिळाली. श्री.ना.नी कर्ज काढून छपाईसाठी दिले. पुस्तक छापल्यावर रेल्वे पार्सलची रिसीट आली तेंव्हा श्री.ना.चा आनंद गगनात मावत नव्हता. अंकलपीच्या स्वरूपाचे पुस्तक त्याची कागद व छपाई सामान्य होती. "आतला मजकूर तेवढाच सस्ता होता, हे त्यावेळी कळत नव्हते एवढेच त्यातल्या त्यात समाधान."[6]

श्री.ना.च्या 'खडकावरील हिरवळ' मधील लेख महत्वाचे वाटतात. त्यातूनच त्यांच्यापुढे कादंबरी वाड्.मयाचा जन्म झाला आहे.

1) जगूतात्या – श्रीमंतीतून दारिद्रयाकडे वाटचाल करणारा माणूस.

2) काशीताई - हे व्यक्तिचित्र श्री.ना. चे नातेवाईक त्यांचे आजोबा गणेशशास्त्री हयांची बहिण.

3) पांडुबुवा धामणूस्कर – हे व्यक्तिचित्र स्वत:ला संगीत तज्ञ म्हणून घेणारा थापाडया असे वर्णन केले आहे.

4) अण्णा – वक्तशिरपणा आणि बोलकेपणा ही त्यांची वैशिष्टये. प्रामुख्याने तो न्हावी समाजातील असून श्रद्धा ही त्याच्या जीवनाचा आधार आहे.

5) यांयु – या गरीब माणसाची इतरजण कशी टिंगल करतात याचे वर्णन आहे. श्री.ना.नी यातूनच प्रादेशिकता व निसर्गवर्णनाची वाटचाल सुरू केली.

6) आमचे मास्तर – हे व्यक्तिचित्र म्हणजे 'हद्दपार' या कादंबरीची प्रथमावृत्तीच होय.

7) संक्रमणकाळाचे बळी – यामध्ये नव्याचा विचार करणारा व जुन्याचा पश्चाताप न होणारा व रंजन क्रांतीकारक मार्गावरून वाटचाल करणारा माणूस याचे वर्णन.

8) अप्पाशास्त्री – पीळदार व्यक्तिमत्व काशीला राहून संस्कृतवर प्रभुत्व मिळविणारा पंडित.

9) बापूकाका सामल – 'गारंबीचा बापू'चे व्यक्तिमत्व यातून निर्माण झाले.

10) दुर्गेश्वरची सफर – श्री.ना.नी या निबंध लेखनामध्ये निसर्गाचे वर्णन केले.

या वरील सर्व लेखांच्या द्वारे श्री.ना.नी 'खडकावरील हिरवळ' रंगविली. या हिरवळीतूनच त्यांच्या पुढील अफाट अशा वाड्.मयाची निर्मिती झाली आणि अजूनही ती होत आहे.

**कादंबरी लेखन :-**

मराठी कादंबरीमध्ये स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीचा विचार केला तर वेगळे वळण घेतलेले दिसते. विश्राम बेडेकरांची 'रणांगण' र.वा. दिघे यांची 'पाणकळा' आली. मात्र मराठी कादंबरी ही फडके, खांडेकर, माडखोलकर युगात होती. मात्र 1945-48 च्या आसपास विभावरी शिरूरकर, बिलवलकर, श्री.ना. पेंडसे, गो.नी. दांडेकर ही नावे आली. मराठीच्या कादंबरीच्या कक्षाच रूंदावल्या... आणि हयाच पिढीचे महत्वपूर्ण कादंबरीकार म्हणून श्री.ना. पेंडसे पुढे आले ते 1949 ते 1995 या कालखंडामध्ये (एल्गार ते 'एक होती आजी') पेंडशांचे कादंबरीलेखन एका समृद्ध अनुभव विश्वाचे दर्शन घडविते. कोकणच्या मातीतूनच त्यांना यश लाभले आहे. कलावंत म्हणून

त्यांच्या व्यक्तिमत्वाची घडण, कोकणातील घटक, जीवनातील काही घटना याचा विचारही पेंडशांच्या कादंबरीचा विचार करताना महत्वाचे ठरते.

"कोकणच्या पाण्यामातीने वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत मनावर जे जबरदस्त संस्कार झाले ते; जणू काहीं त्या ज्या अवस्थेत कायम ठेवून पेंडशांनी आपले कादंबरी लेखन केले आहे."[7] असे अ.ना. देशपांडे यांनी आधुनिक मराठी वाड्.मयाचा इतिहास भाग दोन मध्ये विचार मांडले आहेत. 1941 च्या 'खडकावरील हिरवळ' नंतर श्री.ना.ची 1949 मध्ये 'एल्गार' ही कादंबरी प्रकाशित झाली. त्यानंतर त्यांच्या लेखनाची हिरवळ ही वाढतच राहिली. कादंबरी लेखनामध्ये त्यांनी एकूण तेरा कादंब-या लिहील्या. कादंबरी लेखनाच्या संखेच्या दृष्टीने चंद्रकांत बांदीवडेकरांनी पुढील मत मांडले. "संखेच्या दृष्टीने त्यांचे लेखन कमी असले तरी, गुणवत्तेच्या आणि वेगळेपणाच्या दृष्टीने पेंडशांच्या प्रत्येक कादंबरीने खळबळ माजवली."[8]

श्री.नां.च्या बरोबर अनेक कादंबरीकारांनी लेखन केले. मात्र श्री.नां.नी कोणत्याही एकाच हेतूने कादंबरी लेखन केले नाही. लेखनामध्ये कोणतीही बाहय प्रेरणा घेतली नाही. त्यांनी मात्र सुख, दु:खाच्या प्रवाहामध्ये माणसे उभी केली. जणूकाही माणसांच्या रूपाने नंदनवनच उभे केले. गंगाधर गाडगीळ म्हणतात "प्रत्येक माणसाच्या हृदयात एक नंदनवन असते आणि त्याच्या आधारे तो जगत असतो."[9] अशा पद्धतीचे नंदनवन कादंब-यामध्ये येते. श्री.ना.ना ज्या प्रदेशाचे जीवनाच्या घडणीचे, भावनांच्या वळणाचे त्यांना विलक्षण आकर्षण वाटते. यातूनच त्यांचे कलाविश्व निर्माण झाले.

मराठी कादंबरी तंत्र आणि विकासमध्ये बापट, गोडबोले म्हणतात - "परिचित प्राकृतिक सृष्टीतील रहस्य वचकांना दाखवून ज्याप्रमाणे इंग्रजी कवी वर्डस्वर्थने मान्यता मिळविली. त्याप्रमाणेच पेंडशांनी प्रथम कोकणच्या राकट पार्श्वभूमीवरच आपल्या अप्रतिम कादंब-या लिहून कोकणच्या जीवनाच्या वैशिष्ट्याला साकार केले व प्रख्यात प्रादेशिक कादंबरीकार हर्डीप्रमाणेच सजीव पार्श्वभूमीवर कथानकाची रचना केली."[10]

**'एल्गार' :-**

'एलगार' ही श्री.नां.ची पहिलीच कादंबरी. मराठी वाचकाला व समीक्षकांना दिलासा मिळाला. या कादंबरीला नॅशनल लायब्ररीने 1949 या वर्षाचे प्रथम पारितोषिक मिळाले. 'एलगार'चे लेखन 1947 मध्ये झाले. हे वर्ष भारताच्या इतिहासातील एक महत्वपूर्ण वर्ष होते. हिंदूस्थानचे

विभाजन, पाकिस्तानची निर्मिती, भारताला मिळालेले स्वातंत्र्य इत्यादी महत्वपूर्ण घडामोडी झाल्या होत्या.

'एलगार'ची निर्मिती श्री.ना.नी 1938 मध्ये 'अमरज्योती' ही कथा लिहीली. त्यावरूनच या कादंबरीचा जन्म झाला असावा असे वाटते. श्री.ना.च्या 'एलगार', 'हद्दपार' व 'गारंबीचा बापू' या तिन्ही कादंब-यांचा नायक एकच आहे. मात्र त्याची रूपे वेगवेगळी दिसतात. त्यामध्ये बापाविरूद्ध भांडण आहे. पांघरूण घालणा-या म्हाता-या आहेत. नायकावर प्रेम करणा-या सौंदर्यवती आहेत. मात्र या तिन्ही कादंब-यांचा विचार करताना वेगवेगळया पद्धतीनेच करणे योग्य ठरते. यामध्ये श्री.नां.चे आत्मचरित्र आले आहे ते स्वतः मान्य करतात. 'खडकावरील हिरवळ' मधील व्यक्तिचित्रांचा विकास 'एलगार' व 'हद्दपार' मध्ये झालेला आहे. 'आमचे मास्तर' या व्यक्तिचित्रणापासून 'हद्दपार' चा जन्म झाला आहे. 'राजे मास्तर' या शिक्षकाचे जीवन हे श्री.ना.नी जवळून पाहिले असावे. त्यामुळेच 'एलगार' व 'हद्दपार' चा नायक हा शिक्षक आहे. श्री.नां.चे व्यक्तिगत व कौटुंबिक जीवनच शिक्षकाच्या व्यवसायाशी एकरूप होते.

'एलगार'मध्ये निबंधस लेखन करताना त्यांनी कोकणचा निसर्ग रेखाटला आहे. 'खडकावरील हिरवळ' मध्ये त्यांनी एक निबंध घेतला आहे. त्यावरूनच 'एलगार'मध्ये ही रेखाटला असावा. निसर्गवर्णनाबद्दल गंगाधर गाडगीळांचे मत "श्री.नां.ना त्यांचे नंदनवन हे यौवनात सापडले नाही तर ते बालपणात सापडले."[11] हर्णेचा दिपस्तंभ या परिसरातीलच आहे. 'एलगार' मधील निसर्गसौंदर्य वेगळे वाटत असले तरी त्यांनी 'हद्दपार' मध्ये सावरले आहे. त्यांच्या पुढील प्रत्येक कादंबरीत निसर्ग हा स्वतंत्र रूप घेऊनच येतो. 'एलगार'मध्ये हिंदू-मुस्लीम हा जातीय संघर्ष आला आहे. श्री.नां.नी हरिभाऊंच्या वळणाने लेखन केले. त्यांनी फडके प्रणीत तत्व नाकारले आहे.

श्री.नां. हे कलंदर वृत्तीचे लेखक आहेत. हे विधान सहजतेने करता येते. त्याचा प्रत्यय प्रत्येक कादंबरीमध्ये येतो. 'एलगार' व 'हद्दपार' या दोन कलाकृतीवरूनच स्पष्ट होते. 'गारंबीचा बापू' नंतर तर त्यांनी प्रत्येक कादंबरीचे तंत्र वेगळे वापरले आहे. 'एलगार'ची जन्मकथा लक्षात घेऊनच तिचा कादंबरी म्हणून विचार करावा लागतो. काही समीक्षकांच्या मतांचाही विचार घेणे योग्य वाटते. कुसुमावती देशपांडे यांनी आपल्या लेखनातून व आकाशवाणीवरून 'एलगार'चे गुणविशेष सांगितले. "श्री.नां.च्या 'एलगार' या पहिल्या कादंबरीचा विषय हिंदू-मुस्लीम या पार्श्वभूमीचा आहे. दोन भिन्न धर्मिय मुलांचे शाळेतील जीवन, त्यांच्या मैत्रीचे संबंध व संघर्ष याचे वर्णन आले आहे. रघूच्या बालपणाचे वर्णन मजेशीर आहे. अखेरच्या टप्प्यामध्ये कादरच्या घराला

आग लागते तेव्हा रघु त्यांच्या कुटुंबाला आसरा देतो असे कथानक आहे. पेंडसे यांच्या शैलीमध्ये सहजसंवादाचा जिव्हाळा आहे. याचे नेमके व प्रत्ययकारी चित्रण झाले आहे."[12]

चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात - 'एलगार' मध्ये 'दोन सुशिल जीवांची प्रेमकथा' त्यांनी सांगितली आहे. ही प्रेमकथा असली तरी तरूण-तरूणींची फडक्यांनी रूढ केलेली प्रणय कथा नाही."[13]

श्री.नां.च्या 'एलगार' प्रमाणेच बिबवलकरांची 'सुनिता' मालतीबाई बेडेकरांची 'बळी' त्या कादंब-यामध्ये हिंदू-मुस्लीम संघर्ष आहे. त्यामध्ये पाकिस्तानची निर्मिती हाच मुख्य विषय आहे. 'एलगार'मध्ये कोकणी जीवनाचा सौंदर्यपूर्ण गौरव आला आहे. 'एलगार'ची कथा साखरपेंडी, सावित्री, सावित्रीचा डोह, रघू, त्याचे खाष्ट वडील, अब्दुलमियाँ, दादूमियाचा पीर, कादर या सर्व व्यक्ति व वस्तू म्हणूनच आले आहेत. श्री.नां.च्या साहित्याची निर्मितीच व्यक्तिरेखातून झाली आहे. 'एलगार'मधील महत्वाच्या व्यक्तिरेखा म्हणजे नायक रघूनाथ बेंद्रे व त्याचा मित्र कादर. त्यांची मैत्री ही श्री.नां.नी जिव्हाळयाची दाखवली आहे. तत्कालीन हिंदू-मुस्लीम संघर्षाने दोघा मित्रामध्येही स्नेह संघर्ष आला आहे.

श्री.नां.नी 'एलगार' मध्ये रघुनाथ बेंद्रे ही प्रमुख व्यक्तिरेखा रंगविली आहे. रघूच्या व्यक्तिमत्वाची उभारणी करताना कळतनकळत पेंडशांचे धाकटे बंधू निजानंद यांच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव अधिक पडला आहे. कथानकाच्या निवेदनाने आत्मचरित्र वाटते. एका शिस्तप्रिय अण्णा भटजीचा मुलगा कमालीचा हुड असतो. वडीलांना आणि मारकूटे पोंक्षे मास्तर यांना तो जुमानत नाही. त्याचा स्वभावच बंडखोर आहे. रघूचा मित्र 'कादर' हा हुषार आहे. तो रघूप्रमाणेच बंडखोर बनतो. पण रघूही कादरप्रमाणे हुषार बनतो. श्री.नां.नी यातूनच दोघांचा स्नेह दाखविला आहे.

रघू व कादर बद्दल अ.ना. देशपांडे म्हणतात "जात्यंधेच्या दुष्ट व अमानुष परिणामांना बोथट करण्यात सुजाण मानवतेची जाणीवचं साह्य करू शकते."[14]

श्री.नां.नी रघूचा हुडपणा अतिशय मार्मिकपणे टीपला आहे. रघू हा शाळेत गेला नाही. तेव्हा मास्तर जाब विचारतात. तेंव्हा रघुने मारलेली नाटकी थाप तो म्हणतो 'माझी आत्या वारली' खरे पाहता आत्या वारलेली नसते. त्या प्रकरणाची चौकशी होते. पण कादरला दिलेल्या चिठ्ठीनंतर तो विषय तेथेच थांबतो. यावरून श्री.नां.नी व्यक्तिरेखांचा विकास करताना सुक्ष्म विचार केलेला नाही हे स्पष्ट होते. रघू आणि कादरची व्यक्तिरेखा एकांगी घडते. त्यामुळे ती कृत्रीम वाटते. हिंदूंचा नाश व पाकिस्ताननिर्मितीस झटणाऱ्या कादरशी रघूची मैत्री आहे. त्यांचें स्नेहसंबंध

अतूट आहेत. रघूचे वडील खाष्ट तर कादरचे प्रेमळ. मात्र रघूची उंची कलात्मक व्यक्तिरेखेची नाही. 'एलगार'चे कलात्मक अपयश हेच आहे. सोयीसाठी पुर्वार्ध उत्तरार्ध आला आहे.

'एलगार'मधील उत्तरार्धाच्या सोयीसाठी दोघांच्या घरातील सर्व थोर व्यक्ती मृत पावल्या आहेत. सावित्रीचा प्रवाह आटत आहे. हिंदू-मुस्लीम संघर्षाचे वातावरण साखरपेंडीतही तयार झाले आहे. रघू व कादर स्वताच्या कर्तबगारीस मोकळे झाले. कादरने सु-यांच्या ट्रंका आणल्या म्हणून लोक त्याचे घर जाळतात. त्यावेळी रघू आश्रय देतो. पण दादूमियाचा पीर मात्र जमावाबरोबर रघूही उखडतो.

श्री.नां.नी या कादंबरीचा शेवट केला आहे. तो जगात ही द्वेषाची आग भडकली त्या माणण्याचे पाणी ओतायचे म्हणून आणि डोळयात पाणी भरविण्यासाठी 'कादर'चा मृत्यू घडविला आहे. आणि कादंबरीचा शेवट केला आहे. 'एलगार'च्या लोकप्रियतेचे रहस्य आहे. कथानकाच्या सरळ निवेदनात. भारताचे स्वातंत्र्याचे आंदोलन त्यातून निर्माण झालेला हिंदू-मुस्लीम संघर्ष त्याचा साखर पेंडीवर झालेला परिणाम दोन मित्रांच्या जीवनात निर्माण झालेले भावनाटय हे 'एलगार' चे कथानक याचा कालावधी 1945 ते 1947 चा हा आंदोलनाचा कालखंड आहे. त्यातच देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीचे वेड आहे. याचा जीवंत संघर्ष श्री.नांच्या 'एलगार'च्या लोकप्रियतेस व कलाकृतीस साक्ष होती.

'एलगार' मध्ये निसर्गाचे वर्णन श्री.नां.नी ललितमय केले आहे. कोकणचा भूप्रदेश, सहयाद्रीच्या कपारीने वेढलेला भाग त्यामध्येच दादूमियाचा पीर, दुर्गादेवीचे मंदीर या दोन्हींच्या यात्रा मात्र साखरपेंडीच्या पंचक्रोशीला जोडणारी आहे. रघूला आवडणारे व पहिल्यांदा मिळणारे मियाच्या घरातील फणस व आंबे आहेत. श्री.नां.नी निसर्गालाच बोलके केले आहे. 'काशाकोळी' स्वातंत्र्याच्या संग्रामात जावून मृत होतो. क्रेर शेअरअली, रघूची आई, पत्नी, कादरची आई, पत्नी, दोघांची मूले, डॉ. मार्टिन इत्यादी व्यक्तिरेखा येतात. श्री.नां.नी नायिकेचे सौदर्य वर्णन केले नाही. त्यांनी फडके व माडखोलकरांचे तत्व मोडण्यासाठीच ते केले असावे.

श्री.नां.नी 'एलगार' मध्ये समूहमन, प्रसंगनिर्मिती यांच्या पाऊलखुणाच उमटविल्या. श्री.नां.ची शैली हरिभाऊ वळणाची आहे. ती कोकणच्या हिरव्या वैभवातून श्रध्दांकडे जाते ते हिरवेपण 'एलगार' चे मोठेपण आहे. आणि हेच हिरवेपण 'हद्पार' मध्ये अधिक चांगल्या प्रमाणात प्रकट झाले आहे.

**'हद्दपार'**

श्री.नां.नी कौटुंबिक समस्यांना तोंड देत 'हद्दपार' कादंबरीचे लेखन केले. मात्र कोणता विषय घ्यायचा ते समजत नव्हते. पहिल्यांदा 'निर्वासितांचा' प्रश्न मनामध्ये आला. मात्र नंतर ते 'आमचे मास्तर' हया 'खडकावरील हिरवळ' मधील कथेकडे वळले. प्रारंभासाठी 'कोरडे' घराण्याचा इतिहास मिळाला. त्यांना नायक हा 'कायस्थ' हवा होता. त्यांना लहाणपणीचे वयोवृद्ध राजेमास्तर आठवले. पुढे "राजेमास्तर आणि दामले मास्तर हया दोन अस्सल शिक्षकातून राजे मास्तरांचा जन्म झाला."[15] आणि 1950 च्या विजयादशमीला 'हद्दपार' प्रसिद्ध झाली. आणि अल्पावधीतच तिची प्रशंसा होऊ लागली.

श्री.नां.च्या 'एलगार' चा जन्म ज्या पद्धतीने झाला त्याच पद्धतीने 'हद्दपार' जन्मली. मात्र तिची झेप मोठी ठरली. कादंबरीचा नायक शिक्षक त्यावेळी श्री.नां.ही शिक्षकच होते. कादंबरीमध्ये राजपुत्राबरोबर राजकन्येला प्रवेश मिळाला नाही. फक्त ती सुंदर होती एवढेच वर्णन आले. मात्र पुढे 'गारंबीचा बापू' मध्ये ही जोडी उठावदार ठरली. 'एलगार' पेक्षा 'हद्दपार' मध्ये व्यक्तिचित्रे उठावदार वाटतात. राजे असूनही ते मास्तरही व राजेही झाले. श्री.नां.नी व्यक्तिरेखा तेजस्वी करण्याचा प्रयत्न केला. सर्व पात्रे राजे मास्तरांचे व्यक्तिमत्व साकारण्यासाठी येतात. यामध्ये मास्तराबद्दलचा आदर व आपलेपणा शैलीतील तोल आणि नेमकेपणा विस्कटून टाकतो. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात. "वाचकांच्या मनात राजे मास्तर आदर निर्माण करू शकले तरी पेंडशांना जे अपेक्षित आहे ते दिव्य, भव्य, अलौकिकत्व दुर्बिणीतूनही दिसत नाही. खुद्द पेंडसे एका बाजूला बिरूदावली योजतात. तर दुस-या बाजूला वस्तुस्थितीची जाणही दाखवतात."[16] मास्तरांच्या प्रतिमेकडे पाहिले की यश, किर्ती, बुद्धिमत्ता यामुळे स्वतंत्र जग निर्माण करण्याची प्रतिभा त्यांच्याजवळ आहे. दुर्गेश्रवरामध्ये अनेक मास्तर झाले. परंतु त्यांच्या सारखे नाहीत. राजेमास्तर मात्र कलात्मकदृष्टया एकरूप झाले नाहीत. बापट/गोडबोले म्हणतात "श्री.ना.पेंडसे यांच्या श्रद्धायुक्त अंतःकरणातूनच 'हद्दपार' मधील राजे मास्तरांची मूर्ती निर्माण झाली आहे."[17]

श्री.नां.नी 'हद्दपार' मध्ये राजे घराण्याचा इतिहास घेतला. पहिले 'कोरडे' घराणे. बंडो आबाजी हे कोयतीने वाघ मारतात. आणि घराणे 'राजे' होते. दुर्गेश्वराच्या राजेघराण्यात बंडो आबाजी ते राजे मास्तर ही दोन टोके होती. मात्र मधल्या पीढीमध्ये भाईचे (राजे मास्तरांचे वडील) वर्चस्व होते. मात्र राजांची पोकळ इनामदारी होती. 'कोयती' हे घराण्याचे प्रतिक मात्र त्यास 'राजे मास्तर' धक्का देतात. क्षत्रीयपणा सोडून ते शिक्षकी पेशा स्विकारतात. वडिलांच्या विरोधाला जुमानत

नाहीत. 'राजेमास्तर' मुलामध्ये रमतात. त्यासाठी स्वत:चा पैसा खर्च करतात. गावातील वाईट परंपरेला आळा घातला. पाणक्याच्या मुलीशी प्रेमविवाह करतात. हयाच बंडखोरीमुळे त्यांचे वडील कोयतीसह विहीरीत उडी घेतात. मात्र 'राजे मास्तर' हे बंडखोरच राहतात. गंगाधर गाडगीळ राजे मास्तर बद्दल म्हणतात – "संसार करणे कोणत्याच राजाला जमले नाही, ते या राजाला काय म्हणून जमावे? आस्ते आस्ते परक्या मुलखातील ही मुलुखगिरी राजाने बंद केली आणि आपल्या सत्तेच्या हक्काच्या राज्यांकडे तो वळला."[18]

अ.ना. देशपांडे म्हणतात – "पोकळ व अर्थशून्य प्रतिष्ठांच्या बडेजावाला न भाळणा-या या राजेमास्तरांतील सहृदय मानवता त्यांनी निदर्शनास आणून दिली."[19]

श्री.नां.च्या राजेमास्तरनी मुलांना सहभोजन, सहली यातून रमवून जुन्या शिक्षणपद्धतीला धुडकावून दिले. त्यांनी दारिद्रयाला झगडतानाही लाचारी पत्करली नाही. स्वत:चा मुलगा आजारी असताना कोणाची मदत घेतली नाही. मात्र श्री. नां.नी राजे मास्तरांना रंगविताना आडवे येईल ते छाटून टाकले. 'एलगार' आणि 'हद्दपार' मधील शिक्षकांचे प्रसंग सारखेच आहेत. रघू ट्रेनिंगला जाताना मियॉंकडून कर्ज घेतो तर राजेमास्तर सोन्याबापूकडून घेतात. रघूच्या प्रेरणेने काशाकोळी व महादया बटावळ तरूण भेटतात तर राजेमास्तरांना निर्मल, जोशी, शिंत्रे सारखे तरूण भेटतात. ते सर्वच कर्तबगार वाटतात.

राजेमास्तरांनी अन्यायाला सामोरे जाताना स्वत:च्या नोकरीचा राजीनामा दिला. मात्र श्री.नां.नी. राजे मास्तरांचे नंतरचे जीवन कसे चालणार आहे याकडे दुर्लक्षच केले आहे. राजीनामा का दिला याचे कारणच त्यांना सांगता आले नाही. कादंबरीच्या उत्तरार्धामध्ये राजे मास्तरांच्याबरोबर निर्मल आला आहे. सामाजिक अन्यायाला झगडणारा तरूण आहेत. त्यात तो विजयी होतो. मात्र मास्तरांच्या बदलीप्रकरणाने त्याला दोन वर्षे हद्दपार व्हावे लागते. त्यामुळे उत्तरार्धात निर्मलच प्रभावी ठरतो. 'हद्दपार' मध्ये श्री.नां.नी अन्यव्यक्तिरेखा उमटविल्या. त्यामध्ये लक्ष्मी, म्हांबरी, आई, नन्नू, विद्यार्थी, निर्मल, जोशी, शिंत्रे, माहाद्याताडी, सोन्याबापू, एज्युकेशनल इन्स्पेक्टर इत्यादी. व्यक्तिचित्रांना 'एलगार' पेक्षा 'हद्दपार' मध्ये नेटकेपणा आला आहे.

'हद्दपार' मधील संघर्ष धार्मिक व आर्थिक स्वरूपाचा आहे. त्यामध्ये धनाढयांनी केलेली कुणब्यांची लुबाडणूक हणून पाडण्यासाठी निर्मलने संघर्ष केला. त्यात विजयी होतो: श्रेय राजे मास्तरांना देतो. ब्राम्हण विरूद्ध कुणबी हा संघर्ष दिसतो. समुहाने राजेमास्तरांची साठी साजरी होते. राजे मास्तरांचे वडील मृत पावतात. तेंव्हा त्यांच्याजवळ श्राद्धासाठी पैसे नसतात. मुलगा नन्नू हा आजारी असताना 'ओंडका' प्रकरणात काशाकोळयाला मदत करतात. मात्र मुलाला वेळेवर

इलाज करता येत नाही. त्याला साधे दूधही मिळत नाही. मुलगा मरण पावतो. मास्तरांना एकटेपण भयान करते आणि स्वत:लाच विजयादशमीला 'हद्दपार' करूण घेतात.

'एलगार' पेक्षा 'हद्दपार' मधील भाषाशैली सुधारलेली आहे. संवादाचे सामर्थ्य वाढविले आहे. त्यामध्ये सुक्ष्मव्यक्तिचित्रण शिक्षक या जीवनातील एकाच व्यक्तिवर केले. राजे मास्तरांच्या सारखे ग्रामजीवन व विद्यार्थी जीवनातील स्थान आजच्या शिक्षकात सापडेलच असे नाही. रोमांचकारी भव्यतेचा यशस्वी प्रयत्न आहे." करवंद्याच्या कातळावर संधीप्रकाशात दूर जाणारी राजे मास्तरांची मुर्ति ही या अंत:प्रक्षेपणाचे एक प्रतिक आहे."[20] असे कुसुमावती देशपांडे यांनी मराठी कादंबरीमध्ये म्हंटले आहे. संवादाचे उदाहरण द्यायचे झाले तर निर्मल व राजेमास्तर यांचे येते. राजीनाम्याच्या वेळचे लक्ष्मीबरोबरचे मनोगत हे हृदयाला गरे पाडणारे वाटते. बंडो आबाजीने वाघ मारणे आणि राजे मास्तरांनी घाणेकरांच्या हॉटेलमध्ये नोकरी करणे हे योग्य वाटत नाही.

श्री.नां.नी 'हद्पार' मध्ये निसर्गाच्या वर्णनामध्ये 'केशवराज' देवस्थान तपशिलासाठी आले असे वाटते. ते 'खडकावरील हिरवळी'तूनच आले. 'एलगार' व 'हद्दपार' मध्ये निसर्ग, व्यक्ति, प्रसंग, प्रदेश एकच आहे. मात्र 'एलगार' मध्ये आत्मनिवेदन व 'हद्दपार' मध्ये चरित्रनिवेदन उतरले आहे. श्री.नां.ची कलात्मकता वाढलेली जाणवते. त्यामध्ये भावनेची हकीकत आली आहे. राजे मास्तरांचा अपमान शिक्षण अधिका-यांनी ज्या कारणासाठी केला. ते योग्यच असे आजच्या समाजाला वाटू शकेल.

श्री.नां.नी काय. मिळविले व काय गमविले इथे त्यांच्या कलात्मकतेच्या सिमारेषा स्पष्ट होतात. त्यातूनच 'एलगार' व 'हद्दपार' चे यशापयश दिसून येते.

**'गारंबीचा बापू'**

'एलगार' व 'हद्दपार' नंतर श्री.नां.ची 'गारंबीचा बापू' ही कादंबरी जन्माला आली. श्री.नां.नी या तिन्ही कादंब-यांचा एकच गट मानला आहे. तिन्हीही 'खडकावरील हिरवळी'च्या व्यक्तिरेखातून निर्माण झाल्या. श्री.नांच्या 'गारंबीचा बापू'ने लोकप्रियता मिळवली. साहित्य अकादमी विजेत्या 'रथचक्र' पेक्षा ती श्रेष्ठ ठरली. गंगाधर गाडगीळ, डॉ. द.भि. कुलकर्णी, नरहर कुरूंदकर, चंद्रकांत बांदिवडेकर, डॉ. भालचंद्र फडके, प्रा. ल.ग. जोग, लता राजे यांनी कादंबरीची प्रशंसा केली.

"श्री. नां.नी.आपल्या माणसावर आदर्श आरोप केले नाहीत. जन्मताच लाभलेले

गुणदोष परिस्थितीतून घेतलेले थोडेफार संस्कार यांच्या बळावर पेंडशांची माणसं जगतात. त्यामुळे ती अधिक जीवंत वाटतात. त्यांनी माणसं दिसली तशीच घेतली त्याचे वर्णन केले. गारंबीची माणसं मेहणती आहेत. ती रूढी परंपरांना जखडली आहेत."[21] असे चंद्रकांत बांदिवडेकरांचे मत सार्थ वाटते.

"गारंबीचा बापू'कडे पाहणे म्हणजे एक त्यांचे नंदनवनच होय. या कादंबरीमध्ये एक महत्वाची गोष्ट साकार केली ती म्हणजे मराठीच प्रथमच निसर्ग व वातावरण हे पार्श्वभूमी व सजावट म्हणून न येता येथे पात्र म्हणून आले."[22] असे नरहर कुरूंदकरांचे मत आहे. हा प्रयोग इतर कोणत्याही लेखकाला जमला नाही. तो श्री.नां.नी 'गारंबीचा बापू'द्वारे समोर आणला.

श्री.नां.च्या 'गारंबीचा बापू'ने महायुद्धोत्तर काळात लोकप्रियता मिळवून तंत्रवाद नाकारून जमेच्या बाजू स्विकारल्या. कादंबरीचे कथानक झंझावाती आहे. कर्तबगारीने अफाट बणनारा नायक सर्वांना बरोबरीने घेणारा. पण आडवा येईल त्याला नेस्तनाबूत करणारा. शेवटी विनाशाच्या पर्वतावर दिमाखदारपणे कोसळणारा दिसतो. यातूनच कथानकाची निर्मिती होते. व्यक्तिरेखावर जास्त लक्ष व कोकणच्या परीसरावर प्रेम दिसते. 'बापू'चे व्यक्तिचित्र महत्वाचे आहे. आई असूनही तो पोरका आहे. ती व्याभिचारी आहे. बापूला मोठा बनविताना श्री.नां.नी तिच्याकडे दुर्लक्षच केलेले दिसते. बापू हा सुसंस्कृत आहे. मात्र जेंव्हा त्याच्यावर 'यमी' प्रकरणाचा घाणेरडा आळ येतो तेंव्हा तो घायाळ होतो. मात्र अण्णा खोताला वेळीच चोख उत्तर देतो. 'राधा' या विधवा गुरवीणीशी लग्न करतो. सर्व गारंबी त्याला विरोध करते. मात्र तो जुमानत नाही. तो ब्राम्हणांच्या विरोधी कोळी-कुणबी व गुरवांच्यात बसतो. मात्र गारंबीला तो सिमेंटचा पाट, विहीरी, साकव, शाळा देतो. पूर्वार्धात विठोबा तर उत्तरार्धात रावजी षंढ हे त्याच्या पराक्रमास कारणीभूत ठरतात. आणि बापू 'अफाट' होतो. तो फक्त यमीचा आळ व गारंबी गुरवांचा संघर्ष त्यासाठी सरपंच पदासाठी बापूची माघार या दोन वेळी फक्त तो हताश होतो. एवढे सोडले तर सर्वत्र यशस्वी वाटचाल आहे. बापूजवळ स्वाभिमान आहे तो अपमानाचा वेळीच बदला घेतो. गारंबीतील अण्णा खोत श्रेष्ठ असूनही तो बापूजवळ दोन हात करू शकत नाही.

बापूबद्दल बापट/गोडबोले म्हणतात - "कोकणच्या लोकांच्या कूपमंडूक वृत्तीला व बुरसट विचारसरणीला बेडर वृत्तीचा बापू हे एक आव्हानच आहे." "दैवायत्त कुले जन्म मदायत्तं तु पौरूषं" अशा प्रेरणेने बापू सभोवतालच्या प्रतिकूल परिस्थितीवर विजय मिळवून पुढे येतो, आणि पूर्वीचे टवाळखोरच त्याच्यापुढे लाचारी दाखवतात."[23]

'राधा' ही अप्रतिम लावण्य असणारी व्यक्तिरेखा तिचे सौंदर्य प्राजक्ताच्या फुलासारखे न कोमजणारे आहे. नरहर कुरूंदकर म्हणतात - "पेंडसे यांची राधा ही एक मोहक स्वप्ननगरी आहे,

ती स्वप्नातील साकार सुंदरी आहे.[24] राधाला रावजीने हवीतशी भोगली त्यामुळे तो षंढ झाला. आणि राधा बापूच्या जीवनात आली ती सुसंस्कृत स्त्री म्हणून. 'गारंबीचा बापू' या कादंबरीमध्ये महत्वाची व्यक्तिरेखा 'राधा'च दिसते. तिच्यामुळे बापूच्या जीवनाला आधार मिळाला. बापूला विठोबा, दिनकर, मावशीचे प्रेम मिळाले. परंतु ते राधेएवढे नाही. बापूला राधा सावरते आणि अफाट बनविते. सौंदर्य, संयम सहजता हे तिच्यामध्ये गुण आहेत. दिनकरशी बोलतानाही ती अशीच दिसते. तेंव्हा गंगाधर गाडगीळ म्हणतात – "दिनकर आणि राधा यांचे संवाद म्हणजे तर भावनांचे एक नाजूक नक्षीकामच आहे."[25] पण हीच राधा बापूपासून दिवस जातात तेंव्हा गर्भपात करण्याचा प्रयत्न करते. ती सुसंस्कृत आहे म्हणून.

श्री.नां.नी बापूला मोठा करण्यासाठी विठोबाला निसर्गतःच जन्मषंढ बनविले व रावजीला कामवासनेने षंढ बनविले तर अण्णा खोतांचा जावई 'सपाट बापू' तो कायमच सपाट राहिला. हया तिन्ही व्यक्तिरेखा बापूला मोठा करण्यास कारणीभूत ठरतात.

दिनकर हा बापूचा मित्र 'एलगार' मध्ये रघू व कादर, 'हद्दपार' मध्ये राजे मास्तर व विद्यार्थी तर 'गारंबीचा बापू' मध्ये बापू व दिनकर हे मित्र आहे. तिन्ही ठिकाणी मैत्रीला वडिलांचे विरोध आहेत. पुढे हत्या व भुत्याचे तसेच आहे. एकच अनुभव श्री.ना. वेगळया पद्धतीने मांडताना दिसतात. दिनकर हा बापूला योग्य त्या ठिकाणी मदत करतो. व्याघ्रेश्वराला बापूला सांभाळण्यासाठी प्रार्थना करतो. मात्र दोघांचा स्नेह निर्हेतुक आहे. बापूचा धुंदपणा त्याच्या काळजीचा विषय. मात्र दिनकर बापूला प्रेमाखातर अन्य मदत करू शकला नाही. बापूला माया देणारी भुतवाडची मावशी आहे. ती विधवा, तिचा मुलगा 'बाबू' निघून जातो. नंतर ती त्यालाही जवळ करते. श्री.नां.च्या जवळ व्यक्तिरेखाटणाचा एक जीवंत नमूनाच आहे.

'यशोदा' ही बापूची आई असूनही तिने बापूला कधी माया दिली नाही. ती भोगवादी आहे. तिला मुळातच व्याभिचाराला अडचण म्हणून मूल नको होते. मग विचारपूस लांबच. ती लहानपणापासूनच व्याभिचारीनी तिने गारंबीमध्ये कोणालाही सोडले नाही. मोबदला म्हणून ऐवज घेतला नाही. गर्भवती झाल्यावर गर्भनाशासाठी पारा खाते. त्याचा उपयोग होत नाही. विठोबा नावाच्या षंढाशी लग्न करते. तो अण्णा खोत लावतात. विठोबा फक्त कुंकवाचाच धनी होतो. जमीच्या प्रकरणात बापूलाच दोषी करते. हॉटेलच्या नोकरीच्यावेळी, राधा-बापू प्रकरणातही बापूलाच दोष देते. पण शेवटी कामवासनेने थंड होते. तिला गारंबीत कोणीही आसरा देत नाही. तेंव्हा तिला पुत्रप्रेमाचा पान्हा फुटतो आणि गारंबीच्या विरोधात जाऊन बापूला सरपंच करते.

'अण्णा खाते' ही गारंबीतील मातब्बर आसामी त्याच्याजवळ सरपंचपद सांभाळण्याची व्यवहारी बुद्धी आहे. घरातील भावजयीचे पंढरपूर प्रकरण, यमीचे प्रकरण पचवितो. बापूला गडयासारखा वागवितो. जावई 'सपाट बापू' 'बापू'चा अपमान करतो. सा-या गारंबीला पचविणारा अण्णा खोत मात्र बापूला पचवू शकत नाही. शेवटी स्वता होवून बापूला सरपंचपद देतो. मात्र त्यातही त्याचा व्यवहार आहेच.

श्री.नां.ची 'गारंबीचा बापू' अनेक पात्रांनी गजबजलेली आहे. तेथील निसर्ग हा व्यक्तिरेखाना आकार देताना दिसतो. व्याघ्रेश्वर, गारंबीचा पाट, वणद्याची विहिर, साकव, पोफळीच्या बागा, सुपारी बागा अशा निसर्गाची संपन्नता व्यक्तिरेखेत उमटली आहे. प्रसंगवर्णन अप्रतिम स्वरूपाचे आहे. मराठी रसीकांना बेहद्द खूष करणारे संवाद आहेत. मात्र हया संवादाची पातळी पुढे श्री.नां.ना पुन्हा गाठता आली नाही. हे विचार सौंदर्याने उत्कट, तिखटपणे उतरले आहेत. श्री.नां.ची भाषाशैलीही कोकणच्या वा-यासारखी, भन्नाट, टवटवीत निसर्गासारखी आहे. 'गारंबीचा बापू' ची भाषाशैली रसिकांना आवडली. त्यामुळे ती दोष पचवूनही श्री.नां.ना अफाट करून गेली यात मात्र शंका नाही.

वा.मं.ची 'इंदूकाळे सरला भोळे' व साने गुरूजींची 'शामची आई' ज्याप्रमाणे महाराष्ट्राने डोक्यावर घेतली तोच योग श्री.नां.च्या 'गारंबीचा बापू' ला आला हे म्हणणे रास्त ठरते.

**यशोदा**

श्री.नां.च्या 'गारंबीचा बापू' ने लोकप्रियता मिळविल्यानंतर 'गारंबीचा बापू'ची समाधी म्हणून त्यांनी 'यशोदा' कादंबरी लिहीली. मात्र 'यशोदा'च्या अगोदर त्यांच्या 'हत्या'ने जन्म घेतला होता. 'यशोदा'चे लेखन जगाच्या प्रवासामध्ये केले. कौमार्यावस्थेतील स्त्रीची वेदना साकारताना श्री.नां.नी 'यशोदा' मध्ये क्रांतीकारक बदल केला. तिच्या बांधणीकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. अशा पद्धतीचा आरंभ त्यांनी नेमका पकडला. शेवटी वाचक सुन्न होतो असे श्री.नां.चे म्हणणे आहे. मात्र यशोदेची वेदना साकार झाली नाही. तिच्या अंतरंगात शिरता आले नाही. "यशोदाची वेदना शिरूभाऊ साकार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण ज्या व्यक्तिला त्यांनी भिडायलाच हवे होते, रक्तबंबाळ करायला हवे होते. त्या यशोदेकडे फारसे पहातच नाहीत. यशोदेला फक्त आपल्या सौंदर्याची, या सौंदर्याचे प्रतिक असलेल्या लांबसडक केसांचीच तेवढी काळजी लागलेली राहून दिसते. तिच्या समग्र वेदणेचा वेध घेण्याचे त्यांना भान राहू नये हे आश्चर्य"[26] लेखक आणि माणूस एक

मित्र या पुस्तकामध्ये श्री.नां.नी स्वता म्हंटले आहे. श्री.नां. एक मित्रमध्ये 'यशोदे'च्या प्रसिद्धीबद्दल म्हणतात "'यशोदा'मध्ये मी एक भयंकर गफलत करून बसलो आहे. माझ्या दृष्टीने कादंबरीतील वैगुण्य असहय आहे असं कसं झालं? यशोदामध्ये ताई, अक्का, काका हया सर्वांच्या प्रतिक्रिया आल्या आहेत; फक्त यशोदाला काय वाटले एवढेच आले नाही."[27]

'यशोदा' कादंबरीच्या प्रारंभ व शेवटावर मर्यादा पडल्या आहेत. दहा वर्षापूर्वी डोळे गेलेले काका सरळ होऊन येतात. मात्र यशोदेचा व्याभिचार पहावयास मिळतो. फक्त त्यांना निसर्गाचाच आनंद घेता आला. 'गारंबीचा बापू' तून 'यशोदा' जन्मली. फक्त काका हे व्यक्तिचित्र वेगळे आहे. अपयशाची कबूलीही श्री.ना. देतात. 'यशोदा' ही मुळातच भ्रष्ट आहे. नरहर कुरूंदकर म्हणतात. "ही यशोदा तपशीलाने पुन्हा मांडण्याची धडपड पेंडसे यांनी करून पाहिली ती अयशस्वी झाली. परंतु ते वासनेचे धगधगाते अग्निकुंड आहे."[28] यशोदाने बालपणात व्याघ्रेश्वराच्या साक्षीने घंटा वाजवताना पांडू भटाचा स्पर्श घेतला. त्या स्पर्शाने तिचे यौवन जागे झाले. पांडू भटाला तिने देवळाच्या गाभा-यात जवळ घेतले आणि तिथून पुढे गारंबीच्या कोणत्याच पुरूषाचं सौख्य नाकारले नाही. पुढे तर व्यभिचार हेच तिचे जीवन झाले. जेव्हा यशोदा गरोदर राहते तेंव्हा ती अण्णा खोताला व्याघ्रेश्वराच्या देवळात मिठी मारते. ही 'यशोदा' वाचकांना कशी रूचेल म्हणूनच ती अपयशी ठरली. व्यवहारी अण्णा खोताने विठोबा षंढ असतो त्याच्याशीच यशोदाचे लग्न लावले. अण्णा उठावदार वाटतो. त्यामुळे 'यशोदा' ही शून्य वाटते.

श्री.नां.च्या 'यशोदा' मध्ये बापू एकटया अण्णांचा आहे असे एका वाक्याने स्पष्ट होते. पण ते तितकेसे खरे वाटत नाही. 'गारंबीचा बापू' मधील 'यशोदा' सर्वांना सौख्य देणारी आहे. तर मग इथेच का नाही. ज्या व्याघ्रेश्वराच्या देवळात व्यभिचार केला त्याचीच साक्ष देतना दिसते. याच्यापेक्षा जास्त 'यशोदे'स पवित्र बनविणे लेखकालाही शक्य नाही.

'गारंबीचा बापू'मध्ये न आलेली 'यशोदा' मध्ये आलेली काकांची व्यक्तिरेखा आहे. त्यांच्या सु:ख दु:खाचे धागे चांगले टिपले ही समाधानाची बाब ठरते. मात्र बाकीच्या व्यक्तिरेखा जास्त उंची घेऊ शकल्या नाहीत. फक्त अण्णा खोताच्या व्यक्तिरेखेची उंची वाढलेली आहे. श्री.नांच्या व्यक्तिरेखा हया स्वाभावात आहेत. विकासामध्ये नाहीत. त्यामुळेच 'यशोदे'ला मर्यादा पडल्या आणि फेररचना म्हणावी तशी होऊ शकली नाही.

**हत्या आणि कलंदर**

श्री.नां.नी नव्या लेखनाचा टप्पा सुरू केला तो 'हत्या' व 'कलंदर' ने या दोन्ही कादंब-या वस्तुतः एकच आहेत. 'एलगार'च्या यशानंतर 'हद्दपार' आणि 'गारंबीचा बापू'ने तर यशोमंदीराचा कळसच गाठला. परंतु एवढयावरच श्री.नां.ना थांबायचे नसावे. त्यांना पुढे वाटचाल करायची होती. कोणताही लेखक 'प्रतिभाही दैवी देणगी आणि तिची बहिण स्फुर्ती यातूनच कलावंत घडतो" अशा वाटचालीनेच श्री.नां.नी 'हत्या' ही कादंबरी लिहिली आहे. "या कादंबरीकरिता त्यांनी प्रथमपुरूषी निवेदन स्विकारले. सर्वस्वी अपरिचित असलेल्या जीवनात डोकावण्याचा एक धाडशी प्रयत्नही शिरूभाऊंनी 'हत्या' कादंबरीत केला."[29] श्री.नां.च्या एक मित्रमध्ये 'हत्या' बद्धल म्हणतात. "हत्या खरोखरच सुंदर वाढत आहे. त्याचे अंतिम स्वरूप कसे असेल माहीत नाही; पण वाचकांनो मी 'गारंबी' नंतर आणखी एक धक्का देणार"[30]

'हत्या' कादंबरीची जन्मकथा भाऊबिजेसाठी निघालेल्या तरूणाची वाटेत हत्या होते. तो गुन्हेगार जगाकडे पदविधर, सुसंस्कृत असूनही कसा वळला हे महत्वाचे आहे. 'हत्या'चे लेखन श्री.नां.नी त्याच्या बालपणापासूनच सुरू केले. मात्र तो मवाली, दादा असू शकत नाही. यापूर्वीच्या कादंब-यामध्ये श्री.नां.नी नायक एकदम मोठे केले. मात्र 'हत्या'मध्ये बालपणापासूनच नायक उभा केला.

श्री.नां.च्या 'हत्या' आणि 'कलंदर' मध्ये एकाच नायकाचे जीवन आहे. 'हत्या'मध्ये नायक बालपणापासून ते पंधरा वर्षाचा होईपर्यंतचे वर्णन आहे. 'हत्या' हा नायक कोकणातून पळून जाऊन मुंबईमध्ये तीस वर्षे राहतो. त्यानंतरचा काही महिन्याचा कालखंड म्हणजे 'कलंदर' होय. हया दोन्ही कादंब-यामध्ये वर्णनाचा भाग महत्वाचा आहे. 'हत्या' मध्ये कोकणचा निसर्ग आला आहे. 'करवंदे' हे त्याचे गव. त्याच्या घराच्या पाठीमागे पाण्याचा पाट आहे. हत्याचे एकत्र कुटुंब आहे. पण त्याच्या वडिलांच्यामुळे ते फुटले जाते.

'हत्या'च्या पुर्वार्धामध्ये त्याच्यावर प्रेम करणारे आजोबा आहेत. परमू, काका व काशी बहिण आवडती माणसे आहेत. तर उत्तरार्धात भुत्याची मैत्री आहे. हत्याला जेंव्हा परिस्थितीने हॉटेलमध्ये नोकरी करावी लागते तेंव्हा ही मैत्री जमते. कादंबरीमध्ये पात्रांची गर्दी आहे. हत्याची व भुत्याची कुटुंबे व सिंधू वेंडरची माहिती सोडली तर इतर पात्रे तपशीलात भर टाकणारीच 'गारंबीचा बापू' मधील पात्रे बापूला आकार देतात तशी इथे 'हत्या'ला देणारी नाहीत. 'कलंदर' मध्ये पात्रे येतात पण ती मुंबईमधीलच आहेत. श्री.नां.ना 'हत्या'ची व्यक्तिरेखा ठळक करण्यासाठी पात्रे

कमी करणे शक्य होते. मात्र तो मोह त्यांना आवरला नसावा. 'हत्या' व 'कलंदर' मधील तपशीलांना कादंब–यांचे सौंदर्य मर्यादीत केले आहे.

श्री.नां.ची हॉटेल या योजनेमध्ये अकलात्मकता दिसते. 'गारंबीचा बापू' मधील बापू व 'हत्या' व 'कलंदर' मधील हत्याचे जीवन हॉटेलमध्ये बदलते. त्यांना मित्रही तिथेच भेटतात. दिवस जाणे व गर्भपात करणे हे एक शस्त्र त्यांनी वापरले आहे. 'गारंबीचा बापू' मध्ये रावजीपासून राधाला नाही तसे इथे सिंधूलाही मूल झाले नाही. रावजी नामर्द आहे. तसाच शिवराम पळसुलेही नामर्द आहे. गर्भ राहण्याच्या योजनेचा फक्त वापर इथे श्री.नां.नी केला आहे. कांचनला दिवस गेल्याचा खोटा आळ हत्यावर येतो. तर मोतीराम हेमाला दिवस गेल्याचे खोटे सांगतो. त्यामुळे मात्र कांचन व हत्या दोघेही बदनाम होतात. दोन्ही कादंब–या 'हत्या'चे जीवनदर्शन घडवितात. मात्र 'हत्या' मध्ये हत्या व भुत्याची मैत्री आहे. तर 'कलंदर' मध्ये हत्या व मोतीरामची मैत्री आहे. परोपकार हा हत्याचा स्वभाव आहे. दोन्ही कादंब–यांचा शेवट हा सारखाच आहे. 'हत्या' मध्ये हत्या हा मुंबईला जातो. तर 'कलंदर' मध्ये मुंबई सोडतो. खरे पाहतां श्री.नां. सारख्या जाणत्या लेखकाने हे साम्य टाळायला हवे होते. 'कलंदर'मध्ये श्री.नां.नी आव्हान टाळलेले दिसते. तो मुंबईला गेल्यावर तीन वर्षामधील त्याची व्यथा मांडली नाही. 'कलंदर'मध्ये हत्याला प्रारंभीलाच अठरा वर्षाचा समोर उभा केला. श्री. नां.नी 'हत्या' व 'कलंदर' हा कादंबरीलेखनाचा नवा विक्रमच केला आहे. 'हत्या' मध्ये पंधरा वर्षाचा 'हत्या' उमटला आहे. त्याच्या बालमनाचे वर्णन आहे. तर 'कलंदर'मध्ये अठरा वर्षानंतरच्या काही महिन्यांचे वर्णन आहे. हत्याच्या वडिलांना अटक होते. घरची जबाबदारी त्याच्यावर पडते. तो हॉटेलात नोकरी धरतो. पंधरा वर्षाच्या मुलाला दुसरे काय करता येणार. हे धाडस श्री.नां.च्या सारखा लेखकच करू शकतो. नियतिनेच हॉटेलमध्ये 'हत्या' व भुत्याची गाठ घालून दिली आहे. दोघांच्या मैत्रीबद्धल चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात – "पेंडसे दोन मित्रांच्या जिव्हाळयाचं चित्रण अतिशय एकतानतेने करतात. हॉटेलातील हत्या व भुत्याच्या कुमार वयातील उत्कट, निस्वार्थी मैत्रीचे मोह क्रद्य चित्र पेंडशांनी काढलं आहे. पांढरपेशा नीतीचे कुलीनपणाचे संकेत धुडकावून टाकणा–या हत्या व भुत्याच्या स्नेहसंबंधातलं पावणत्व ताकतीने उभे करताना पेंडशांनी कुठेही कृत्रीमतेचा भावुकतेचा आश्रय घेतला नाही."[31]

श्री.नां.चा 'हत्या' हा नडलेल्यांना मदत करणारा, परोपकारी असा आहे. संकटाला न भिता मदतीला तो धावणारा आहे. भुत्या व कांचनला मदत करताना दिसतो. 'हत्या' कंचाचा मोह टाळतो तो उतावळा नाही. मात्र सिंधूजवळ जाणे हे तारुण्याचे कारण आहे. पण तो वेळीच

सावरताना दिसतो. त्यामुळे हत्याच्या व्यक्तिमत्वाची खोली सिंधूच्या व्यक्तिमत्वात नाही. 'हत्या'वर प्रेम करणारे 'हत्या' मध्ये आजोबा व भुत्या भेटतात. तर 'कलंदर'मध्ये सिंधू व मोतीराम भेटतात. भुत्याची जागा मोतीराम घेतो. पण समजावून घेण्याची क्षमता नाही. आजोबाप्रमाणे सदाशिव आहे. पण तो सुधरविण्याचा प्रयत्न करत नाही. सिंधू ही हत्यावर प्रेम करणारी सर्वात श्रेष्ठ आहे. सदू आणि सिंधूचे प्रेम त्याला माहिती आहे. तरीही त्याला सिंधूची मदत मिळते. 'हत्या' पुन्हा एकदा अंधारातून भविष्याकडे जातो. त्याच्या जीवनातील अंतरिक वादळ कोणी समजू शकले नाही. ही त्याची शोकान्तिका आहे. त्याला सहानुभूतीची फुंकर घालणारे वेळीच कोणी भेटले नाही. चंद्रकांत बांदिवडेकर 'कलंदर' बद्धल मळणतात. "कलंदरमध्ये पेंडसे हत्याच्या मनावर अधिक दृष्टी केंद्रीत करतात. पण हत्याचं मन एकटया हत्याचं नसतं. सिंधू, सदूकाका, कंचा, मोतीराम सगळीच माणसे हत्याच्या मनाला वळणे देतात. माणसांच्या परस्पर संबंधातून गुंतागुंतीच्या भावनात्मक नात्यातून निर्माण होणारे भाव-व्यापार अधिक जिद्दीने पेंडसे 'कलंदर' मध्ये चित्रित करतात."[32]

सिंधूवर प्रेम करणारा सदू हा मुंबईला गेल्यावर माई पळसुलेंच्या आहारी जातो. घरातील सर्वांना विसरतो. हत्यावरही आरोप करतो. 'हत्या'चे घराणे सदाशिवमुळेच फुटले होते. श्री.नां.नी सदू व माई पळसुलेच्या संबंधाचे दर्शन रेखीवपणे केले आहे. एकीकडे सिंधू हातची जाऊ नये म्हणणारा व दुसरीकडे माई पळसुलेबरोबर भागीदारी करणारा. तिच्या सांगण्यावरून हत्याला जीवनातून उठविण्याचा प्रयत्न करणारा सदू हा आहे. एखादा सरळ माणूस कसा कनकांगी स्वार्थी बनतो याचे उदाहरण श्री.नां.नी दिले आहे.

हत्याच्या जीवनातील महत्वाची व्यक्तिरेखा सिधू ही दिसायला सुंदर आहे. 'हत्या'मध्ये तिचे सदूवर प्रेम आहे. त्यामुळे तीचे लग्न व-हाडात केले जाते. पुन्हा ती विधवा होऊन मुंबईत येते. विधवा होण्याची सोय श्री.नां.नी अगोदरच केली आहे. 'कलंदर'मध्ये मुंबईस नर्सिंगचा कोर्सला येते. तिथे सद् व सिंधू भेट होते. मात्र सुंदर सिंधूला माणसांची पारख नाही असे म्हणावे लागते. नवरा, सासरा चांगले असूनही ती एकरूप झाली नाही. सदूवर तीची प्रीती आहे पण त्याचा स्वार्थ कळल्यावर ती 'हत्या'ला सर्वस्व द्यायला तयार आहे. हत्याला अंथरूणात जवळ घेते. अंगातील चोळीही काढते. तरीही तिच्या मनामध्ये कामविकार बळावले होते हे श्री.नां.नी स्पष्ट केले नाही. मात्र हत्याला पाप वाटते. तो भाऊबिजेची ओवाळणी मागतो तरीही सिंधू त्याला मिठी मारते. कंचाला पळवून नेल्याच्या आरोपातून हत्याची सुटका केली. ही तिची महत्वाची कामगिरी. ए-हवी कमालीची फिकी व नाटकी वाटते. ती हत्याच्या जीवनात येते ती निष्पाप म्हणूनच.

'कलंदर' मधील कंचा ही महत्वाची व्यक्तिरेखा दिसते. वडील पौरूष्यहीन, आक्रमक सावत्र आई कंचाचे वेडया मुलाशी लग्न लावण्याचे ठरवते. मात्र 'हत्या' कंचाला मदत करतो. यामध्ये हत्या, कंचा बदनाम होतात. कंचा हत्यावर प्रेम करते. मात्र सिंधूच्या प्रेमाने 'हत्या' विलगत नाही. कंचाची मात्र शोकान्तिका होते.

मात्र स्थलकालातील होण्याचे भाग्य 'हत्या' व 'कलंदर'ला लाभेल असे वाटत नाही. लेखनाच्या मर्यादेनेच लोकप्रियतेपासून दूर ठेवले आहे. आणि ही झळ 'हत्या'पेक्षा 'कलंदर'ला जास्त लागलेली दिसते. जाणत्या वाचक व रसिकांच्या अपेक्षा पूर्ण झालेल्या दिसत नाहीत.

**रथचक्र**

श्री.नां.चे 'हत्या' व 'कलंदर'च्या पुढचे पाऊल म्हणजे 'रथचक्र' होय. ही त्यांची सातवी कादंबरी होय. संपूर्ण कादंबरी विश्वाचा विचार केला तर 'रथचक्र' हा एक महत्वाचा टप्पा ठरतो. पुस्तकरूपाने ती 1962 मध्ये प्रसिद्ध झाली. श्री.नां.ना अखिल भारतीय पातळीवरचे कादंबरीकार ठरविले. तिचा गाजावाजा झाला तो साहित्य अकादमी पारितोषिक मिळाले तेंव्हा. ते एक श्री.नां. नी स्वतः कादंबरीत चर्चेची मते मांडली हे दुसरे. कृष्णाताईची व्यक्तिरेखा वादग्रस्त ठरली हे तिसरे आणि समीक्षकांनी 'गारंबीचा बापू' की 'रथचक्र' श्रेष्ठ यावर गाजावाजा केला.

श्री.नां.ची 'रथचक्र' ही नायिक प्रधान कादंबरी आहे. नायिका 'ती' या नावाने आली आहे. परंतु निवेदनाच्या सोयीसाठी 'अनामिका' हे नाव दिले आहे. श्री.नां.ची पहिलीच नायिकाप्रधान कादंबरी 'रथचक्र' म्हणणे योग्य होईल.

'रथचक्र' कादंबरीबद्धल चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात – "रथचक्र पेंडशांची अनेक कारणासाठी गाजलेली साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झालेली आणि लेखकाची आवडती कलाकृती. सामान्य व्यक्तींच्या सुखदुःखातून, संघर्षातून, जयपराजयातून जीवनाचं रूप प्रस्तुत करणं हा पेंडशांचा स्थायीभाव नियतीबरोबर टक्कर देणा–या कर्णाचं 'रथचक्र' पृथ्वी सतत गिळते आणि कर्णाचा भय्योदात अन्त होतो. ही दैवी कथा. पेंडशांनी हा नियतीचा व माणसाचा संघर्ष एका सामान्य स्त्रीच्या संघर्षाच्या रूपात प्रस्तुत केला आहे. सामान्य स्त्रीजीवनाचं चक्र नियतीशी संघर्ष करताना पदोपदी चिखलात सतत राहतं आणि ती स्त्री पराभूत होऊन निरर्थक जीवन संपवू पहाते, असं पेंडसे 'रथचक्र' मध्ये दाखविण्याचा प्रयत्न करतात."[33] श्री.नां.च्या 'रथचक्र' लेखनाबद्धल बापट/गोडबोले म्हणतात – "अनुभवविश्वाचे विश्लेषण, संकलन व संघटन या सर्जनाच्या तीन प्रमुख अवस्थांची

जाणीव पेंडशांना 'रथचक्र' लिहिताना झाली."[34]

श्री.नां.ची नायिका अनामिका ही 'एका आईने आपल्या मुलाचं भलं व्हावं याकरिता केलेली धडपड' नियती व नायिका यांचा मुकाबला दिसून येतो. तिचे माहेर व सासर हया दोन गोष्टी तिच्या जीवनात आल्या. आई वयाच्या सातव्या वर्षी वारते तिचा आत्या सांभाळ करते. वडिल तिचे लग्न करताना आत्याचा सल्ला घेत नाहीत. लग्नानंतर तिचे सासरचे वर्णन सुरू होते. तिला पतीसौख्य किडकिडे लाभते. प्रेम करावे असे नव-याने काहीही दिले नाही. आठवडयातून एकदा आंघोळ करावी तसे कार्यभान करून जात असे. त्यातच चार मुले झाली आणि तो निघून गेला. सन्मान मात्र त्याच्याच वाटयाला व अवमान तिच्या वाटयाला आला. तिचा पहिला टप्पा हा पतिचा व दुसरा टप्पा मुलांचा. या यातनातून ती सुटू शकली नाही. मुलांनी शिकून मोठे व्हावे असे तिला वाटे. पहिला मुलगा हाताबाहेर गेला. दुस-यासाठी तिने कंबर कसली. संयुक्त कुटुंबामध्ये नियतीने तिच्या वाटयाला दोन आदर्श दिले. एक लखनौवाला दीर व दुसरा थोरली जाऊ. मात्र हे दोघेही तिच्या नव-यालाच आदर्श मानतात. तिने सोने म्हणून हाती घेतले ती माती निघाली. भोवतालची माती जमेल तेंव्हा तिच्या डोक्यात जात होती. ही माती तिच्या कुटुंबातील लोक होते. जावा घालूनपाडून बोलत. त्यांचे पती मिळविते होते. त्यांना मुलांची काळजी नव्हती. मधला दीर व्यभिचारी तर धाकटा कपटीपणाने वागत होता. या वेदनामधून अनामिका बाहेर पडते आणि मुलाला शिकविते. मुलगा तालुक्याला नंबर काढतो. तेंव्हा ती तालुक्याला रहायला जाते आणि तिचा रथच उत्तरायनाकडे जातो. संयुक्त कुटुंबामध्ये असताना तिला तिच्या मुलांच्याबरोबर बोलण्याचाही अधिकार नसतो. मग वळण लावणे व आपले मनोगत व्यक्त करणे लांबच. तालुक्याला ती जाते तेंव्हा तिचा पती तिच्या अगोदर हजर होतो. आणि नियतिच्या विकृतीचे सावट पुन्हा तिच्यावर पडते. ज्या मुलासाठी ती तालुक्याला येते तोही कुटुंबाच्या वळणात जातो. मुलाबरोबर सावधतेने वागण्याचे ठरविते. मात्र ज्या नव-याचा तिने आयुष्यभर द्वेष केला त्याची पूजा मुलगा करीत होता. हे विषारी सत्य मुकाटपणे तिला सोसावे लागले. एवढेच नव्हे तर सर्व तालुक्यामध्ये तिच्या पतीला मौनीबुवा म्हणून ओळखू लागले आणि तिलाही मौजीबुवांची पत्नीच म्हणून ओळखू लागले. मुलगा पहिला आला. त्याचे श्रेय मौनीबुवांनाच मात्र तिचे कौतुक झाले नाही. ती चिडली, हताश झाली. मात्र लोक काय म्हणतील? या भितीने ती पतीच्या पादुकांची पुजा करू लागली. हा तिचा पराजय तिने तो मुलासाठी स्विकारला. नियती मात्र छळ करतच होती. स्वताच्या मुलाला स्वताच्या पायावर उभा राहण्यासाठी प्रयत्न करत होती. मात्र उलटे आरोप तिच्यावर झाले व दिराने फेंगडया मुलीशी पैशासाठी मुलाचे लग्न ठरवले

लहान मुलाचे शिक्षण पूर्ण करणे एवढीच गोष्ट तिच्या आवाक्यातील होती. पण ती गोष्टही सरळ व्हायची नव्हती. मुलगी दरम्याने आजारी होते. धाकटा दीर परत नेण्यासाठी येतो. त्याला नकार देते. त्याने जाताना मुलाजवळ गुरूमंत्र फुंकला. तो मंत्र गावाहून तांदूळ येणार नव्हते. मोलमजूरी करून मुलाला शिकविण्याचे ठरविते. ते मुलाला मान्य होते. नव्याने झुंज सुरू झाली. यशासाठी फक्त पाच महिने बाकी होते. नरवणकरांकडे कुणब्यांमध्ये काम केले. मात्र अखेरच्या दोन महिन्यात आजारी पडली. शेवटी दागिने विकण्यास काढले. पण नियतिने तिला इथेही फटका दिला. ते दागिने पितळेचे होते. उपाय म्हणून 'आडिळा' शिजत घातल्या. पण त्या किती दिवस पुरणार. आणि तिच्या भवितव्याचे, कर्तबगारीचे चक्र इथे पूर्णपणे रूतून बसले. अखेरच्या टप्प्यात तिची फरफट सुरू झाली. मेलेले ढोर ओढल्यावाणी नियतीने तिला फरफटत नेहले. मुलग्याला फॉर्मसाठी पैसे, घरखर्चासाठी धान्य हवे होते. तिचा मुलगा याची तरतूद करतो. पण त्याला तू कुठून आणतोस. ते देणारा अथवा देणारी कोण आहे हया प्रश्नाची उत्तरे विचारण्याची ताकद नियतीने तिच्याजवळ ठेवलेली नाही. उत्तरे शोधली तर मदत मिळाली नसती. आणि तिच्या दृष्टीक्षेपातला विजय दुरावला असता. विजय तिच्या जावांचा, दीरांचा झाला असता. आणि जगात तिचे हसू झाले असते हे तिला मान्य नाही.

तिला नेस्तनाबूत करणारी बातमी कळते. ती कृष्णाताईची तिच्या विपरीत चरित्रचर्चेची. आपल्या मुलाला कृष्णाताईच्या प्रकरणात दोषी मानते. पण खरे गुढ काय ते पाहात नाही. शेवटी स्वतःला दोषी ठरविते. मात्र मुलगा घरी आल्यावर टाकून बोलते. मुलगा रात्रीचा निघून जातो. आणि पती परत येतो. नको असते तेच दावे गळयात पडते. गावी गेल्यावर तिला खूप काही पहायचे होते. थोरली जाऊचा मृत्यू, नव-याचे मोठेपण, लखनौवाला, काका, थोरी या सा-यांनी नव-यासमोर घेतलेली लोटांगणे. यामध्ये एकाकी पडणारे स्वतःचे जीवन मोठया मुलाचे फेंगडीबरोबर लग्न, जावांची बोलणी. तिला शुद्ध करून कुटुंबात घ्यायचे ठरते. हा तिच्या मनावर जबरदस्त आघात. त्यात तिला फिट येते, निराश होते. तेवढयात पहिला आल्याची बातमी मुंबईहून येते. त्या बातमीने ती कृतार्थ झाली. पण साफल्याच्या समाधानाचा क्षणही नियतीने पुरेपूर उपभोगू दिला नाही. मुलाचे पत्र येते त्यात त्याने आईलाच दोष दिला आहे. बापाची थोरवी गायली आहे. कुणालाही भेटण्याची इच्छा नाही. तो येणारही नाही. त्याने आईने मृगजळाच्या मागे लागू नये असे व्यक्त केले आहे. या पत्राच्या पाठीमागे असणारी नियती पुन्हा तिला हसू लागते. त्यातच ती रात्रीची उठते. जीव द्यायला जाते. पाय घसरून पडते आणि रहाटाच्या माळेला अधांतरीच राहते. नियतीचा आणि तिचा खेळ आहे तो असा.

'रथचक्र' ही श्री.नां.ची वास्तववादी कादंबरी आहे. श्री.नां.नी या कादंबरीचे विशेष सांगताना म्हंटले आहे. "या कादंबरीची उपेक्षा करायचा कट कोणी केला असता तरी तो शक्य झाला नसता. मराठी कादंबरी प्रौढ झाल्याचे आश्वासन 'रथचक्र'ने दिले. त्यानंतर 'कोसला', 'सावित्री', 'अजगर' यासारख्या कादंब–यांनी हे आश्वासन दृढ केले. 'रथचक्र' मधील अनेक वैशिष्टये तुकडया तुकडयांनी शिरूभाऊंच्या अगोदरच्या कादंब–यात आहेत. त्याशिवाय आणखी काही बरेच आहे की ज्यामुळे तुलनाही संभवत नाही इतकी 'रथचक्र' ही 'गारंबीचा बापू' पेक्षा उजवी आहे."[35] श्री.नां.च्या 'रथचक्र' या कादंबरीची निवेदनपद्धती लेखकाने केली की नायिकेने केली हे सांगणे अशक्य आहे.

**लव्हाळी**

श्री.नां.ची 'लव्हाळी' ही आठवी कादंबरी 1966 मध्ये प्रसिद्ध झाली. ही कादंबरी कोकणबाहेरचे विश्व घेऊन मुंबई मधील उच्च व मध्यम वर्गीय समाजाचे चित्र उभे केले आहे. श्री.नां.चे कादंबरी लेखनाचे वेगळेपण दिसते. त्यांच्या लेखनात साचेबंदपणा नाही. प्रत्येक कादंबरी लिहिताना थांबायचे त्याचे सिंहावलोकन करायचे. नव्या लेखनाचा प्रारंभ करताना सारे लक्षात घ्यायचे. त्यामध्ये ते प्रयोगशिल आहेत.

श्री.नां.च्या 'लव्हाळी'ने नव्या माध्यमाचा स्विकार केला. ते माध्यम आहे दैनंदिनीतील काही पाने म्हणजे 'लव्हाळी'. श्री.नां.च्या दृष्टीने हे जरी माध्यम नवे असले तरी निवेदन पद्धती मात्र तीच आहे. चंद्रकांत बांदिवडेकरांच्या मते "ही कादंबरी डायरी पद्धतीनं लिहिलेली आहे. ही डायरी आत्मविष्कारासाठी लिहिलेली नाही. आत्मशोधनासाठीही लिहिलेली नाही. लेखनाची बीजं असलेल्या तरूणानं ही नोंद ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे."[36]

उषा हस्तक 'लव्हाळी' बद्धल म्हणतात – "वैयक्तिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जीवनाच्या हया तीन पदरी रूपातून निर्माण होणारी एक आकृतिबंध 'लव्हाळी' मध्ये उभा करायचा असावा असे वाटते."[37]

बापट/गोडबोले म्हणतात – "अदमासे तीन दशकांतील अनेक लहानमोठया घटनांचा, बदलत्या समाजरचनेचा, विविध वैचारिक प्रवाहांचा परिचय अर्धस्फुट पण सूचक शब्दांनी लेखकाने या कादंबरीच्याद्वारे वाचकांना करून दिला आहे."[38]

श्री.नां. पेंडसे एक मित्र मध्ये म्हणतात – "लव्हाळी कादंबरी आहे की नाही याची चर्चा करण्यापेक्षा 'एक संसारचित्र' म्हणून तिच्याकडे पाहण्याचे मी ठरविले आहे; पण ते संसारचित्र

असले तरी कलाकृती म्हणूनच मी तिचा विचार करणार आहे. 'लव्हाळी'चे मला जाणवलेले मोठे यश असे की, एकूण जवळजवळ पाऊणशे व्यक्ति त्यात येतात आणि त्यातील बहुतेकांना जीवंत करण्यात शिरूभाऊंनी यश मिळविले आहे. मुंबईतील मध्यम वर्गीयांचे जीवन इतक्या बारकाव्याने उभे केले आहे की, यापेक्षा अधिक या वर्गाचे चित्रण करता येणार नाही असे वाटू लागते. "आपल्याला निश्चित काय सांगावयाचे आहे याचा अधिकाधिक कादंबरी लिहून होईपर्यंत पत्ता नव्हता." असे श्री.ना. स्वतः म्हणतात. 'लव्हाळी'च्या अपयशाचे रहस्य त्यांच्या या एका विधानात सापडते."[39]

रोजनिशी हे माध्यम प्रत्येक लेखकाकडे असतेच असे नाही. त्यानुसार लेखन करणे सोपे नसते. मात्र श्री.नां.ना जे अवघड आहे ते सोपे करण्याची मुळातच आवड आहे. मोठया जिद्दीने या माध्यमाचा त्यांनी स्विकार केला आहे. त्यांना कारकुनाची दैनंदिनी टिपताना त्यांच्या रोजनिशीचा आधार होता. 'मी' पण स्पष्ट करायचे होते. ते 'लव्हाळी'त केले. अनेक पात्रे आहेत. 'कलंदर'प्रमाणे इथेही चाळ आली आहे. सर्वोत्तम सटकर हा चाळीचा अविभाज्य घटक आहे. त्याच्या जीवनाची अपरिहार्यता तसेच आरंभ व अंतही आहे. दैनंदिनीच्या माध्यमामुळे चाळ ही व्यक्तिरेखा महत्वाची आहे. असंख्य पात्रे एकत्र आणण्याचे तंत्र आहे.

हरिभाऊंच्या 'सदाशिवपेठी' नंतर श्री.नां.ना 'चाळ' गवसली आहे. मध्यमवर्गीयांच्या धडपडीमुळेच 'लव्हाळी' निर्माण झाली. सर्वोत्तम सटकर हा चाळीमध्ये श्री.नां.ना मिळाला आहे. तो वेगळा आहे. दैनंदिनी लिहिण्याची सवय, ललितकला, क्रिडा, जिज्ञासूवृत्ती व दुस-याला जाणण्याची क्षमता त्याच्यामध्ये आहे. त्याच्या व्यक्तिरेखेतूनच चाळसंस्कृती आली आहे. जसा गारंबीचा बापू आहे तसा सर्वोत्तम चाळीचा आहे. चाळ नसेल तर तो शून्य आहे. सर्वोत्तम हा सामान्य कुटुंबातील तरूण. त्याला लेखन, वाचन याची आवड आहे. त्याच्या स्वाभाविकतेतून युद्ध, स्वातंत्र्य, सामाजिक जीवन इत्यादी गोष्टींची नोंद घेऊ शकतो. क्रिडाविश्वामध्ये क्रिकेट, बॅडमिंटन, टेनिस, हुतूतू, हॉकी इत्यादी खेळ त्याला आवडतात. सर्वोत्तममध्ये कलाप्रियता आहे. त्यात सिनेमा, नाटयाची आवड आहे. पण आर्थिक अवस्थेची सीमा आहे. चिंतन करण्याची क्षमता त्याच्या स्वभावाचा विशेष आहे. 'लव्हाळी'मध्ये मनोविश्लेषण नसूनही ते पहावयास मिळते. खरं तर ही दैनंदिनीची नोंद म्हणजे सर्वोत्तमचे मनोविश्व आहे. सर्वोत्तमसारखा जीवनातील स्वप्नाकडून वास्तवाकडे येणारा तरूण 'लव्हाळी'त भेटतो.

सर्वोत्तमने जीवनात स्वप्ने भरपूर पाहिली. संभुसांच्या मंगला बरोबर लग्न करतो. पण सुंदर स्त्रियांच्या सान्निध्यात राहतो. त्यांना जाळयात टाकण्याचा आक्रमकपणा त्याच्याजवळ नाही. त्यामुळे हेमा, सिंधू, जेरूशाचा सहवास हवासा वाटतो. बायको त्याला टाकून बोलते तरी

हेमाबरोबर फोटो व जेरूशाबरोबर शेकहँडचा आनंद लुटतो. मात्र हया स्त्रीयांसंबंधी त्याच्या मर्यादा आहेत. स्वताचा विचार करणारा वेळेस खोटेही बोलणारा, श्रेष्ठतेविषयी मते मांडतो. गंप्या गावंडाचे व्यावसायिक धाडस अयोग्य वाटते. चिंतूला हुंडा मिळाला. त्याची कादंबरी प्रसिद्ध झाली तेंव्हा सर्वोत्तमला वाईट वाटते. सुभाषितांची आवड आहे.

सर्वोत्तमचे कुटुंब त्याचे वडील सामान्य नोकरी करणारे, आई सदैव सुख माणणारी, मेहुणे, गंप्या व पंछ्या हे भाऊ, प्रेमविवाह जुळविणारी नमी, बहिण, पत्नी मंगला यातूनच सर्वोत्तमची व्यक्तिरेखा बनते. चिंतू व देसाई हे मित्र भेटतात. अन्य मित्रही 'लव्हाळी'तून येतात. जागतिक युद्ध व स्वातंत्र्याच्या पातळीवरही सर्वोत्तमच्या स्वभावाचे दर्शन घडते. 'चाळ' व्यक्तिमत्वाचे अंग आहे. चाळीतील प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र व्यक्तिमत्व देण्यात श्री.नां. यशस्वी झाले आहेत. असंख्य रेखीव नमुने उभे केले. मात्र सर्वोत्तमची व्यक्तिरेखा अस्पष्ट वा धूसर होवू दिली नाही. 'गारंबीचा बापू' मधील 'बापू' 'रथचक्र' मधील 'ती' आणि 'लव्हाळी' मधील 'सर्वोत्तम' हया व्यक्तिरेखा केंद्रवती राहिल्या. मात्र सर्वोत्तमची व्यक्तिरेखा चाळसंस्कृतीनेच घडविली आहे. त्याला अनेकांनी नायक बनविले आहे. माणसानं स्वतः पुरतं पहावं आणि बाकी सारं विसरावं ही त्याची सीमारेषा आहे म्हणून तो 'Anti Hero' आहे असे काही समीक्षक म्हणतात. 'लव्हाळी' ही प्रादेशिक कादंबरी आहे. भाषाशैली सर्वोत्तमच्या दैनंदिनीतील स्वताची आहे. ती खाजगीपणाने वास्तवदर्शी झाली आहे. श्री.नां.ची 'लव्हाळी' कादंबरी अपयशी ठरली. तरी या प्रयोगाने त्यांना आणखी पुढे नेहले यात कसलीही शंका नाही. श्री.नां.चे कलात्मक यश योग्य वाटते.

**आक्टोपस**

श्री.नां.नी 'लव्हाळी' नंतर कोकणाबाहेरचे विश्व 'आक्टोपस' मध्ये उतरविले. मात्र 'लव्हाळी' नंतर त्यांच्या मनामध्ये 'दद्या' कादंबरी होती. तिचे 1970च्या दिवाळी अंकामध्ये व्यक्तिचित्र प्रसिद्ध झाले. मात्र लेखनासाठी योग्य विषय सापडत नव्हता. तेंव्हा त्यांना 'आक्टोपस' चा विषय सुचला. ही त्यांची क्रमाने नववी कादंबरी.

श्री.नां.नी 'ऑक्टोपस' ही कामभावनेवर आधारलेली पहिली कादंबरी लिहीली. त्यांच्या इतर कादंब–यामध्ये भावनिर्मितीच्या जोडीला कामभावना आलेली आहे. मात्र 'आक्टोपस' मध्ये फक्त कामभावनाच येते. नंदनवनाबाहेरील जगातील कामेच्छेचा अनुभव मांडताना श्री.ना. हे

पुर्वीचेच दिसतात विकासाची धडपड मात्र अयशस्वी ठरली आहे. प्रणयाचा कैफ त्यांच्या प्रेम करणा-या पात्रापासून दूर दिसतो. 'आक्टोपस' मधील कोणतेही चित्र हादरवून सोडत नाही. त्यांनी कामभावनेलाच नायक व नायिका बनविले आहे. मिनीची विवाहापूर्वी गर्भधारणा लालजीपासून झाली काय ही मंजूताईची शंका नाटकी येते. मात्र वाचकाच्या मनाला सुन्न करत नाही. मंजू व भैय्या अनैतिक संबंधाविषयी वाचक अस्वस्थ बनत नाही. श्री.नां.ना यश लाभले नाही हीच मर्यादा दिसते. कामेच्छेवर लिहिलेली पण कामेच्छेच्या सामर्थ्यापर्यंत पोहचू न शकलेली कादंबरी म्हणजे 'आक्टोपस'.

चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात - "पेंडसे कामवृत्तीला केंद्रस्थानी ठेवून 'आक्टोपस' लिहून दाखवितात. मात्र ही कादंबरी ज्या त-हेने त्यांनी लिहिली आहे. त्यामुळे कामवृत्तीला सामर्थ्यशाली अनुभवच वा त्यातल्या वैविधपूर्ण अंगाचं चित्रण नं होता ही कादंबरी म्हणजे कामवृत्तीवर आधारलेली 'रहस्यकथा' होते. 'पेंडसे फडक्यांच्या तंत्रवादाला आव्हान देतात. साहित्यिकानं माणसावर लक्ष केंद्रीत करायला हवं. जीवनाच्या स्वरूपाचं आकलन करायला हवं. जीवनाचं खोलवर व व्यापक चित्रण करायला हवं असं. मानणारे पेंडसे 'आक्टोपस' मध्ये मात्र संवाद. पत्र वा फोन यांच्या आधारे कादंबरी लिहिण्याचा अट्टाहास करतात."[40]

श्री.नां.नी प्रायोगिक नाविण्याचा नमुनाच पत्र, टेलिफोन, संवाद, वृत्तपत्र यातून केला. तेच 'आक्टोपस'चे यश आहे ते मराठी कादंबरीच्या वाटचालीत लाभले. श्री.नां.च्या वैयक्तिक दृष्टीने विचार केला तर नाविन्य नसून विसतार आहे. टेलिफोन हे संवादाचे माध्यमच फक्त नविन आहे. 'पत्र' या माध्यमातून 'आक्टोपस' ची जमेची बाजू दिसते. मिनी मोडक ही व्यक्ति कामभावनेला ऊसुसलेली रंगेल आहे. तिच्या जीवनात दोन प्रियकर आले आहेत. ते गुरूनाथ व उपेन आहेत. मात्र इतर पात्रांनी पत्रांच्याद्वारे आपले स्वत्व सांभाळलेले दिसते. 'संवाद' हे श्री.नां च्या कादंब-यातील बलस्थान आहे. 'आक्टोपस'मध्ये संवाद प्रत्ययकारी झाले आहेत. चारू पंडित व मिनी मोडक फोर्टमधील हॉटेलमध्ये चहा पिताना संवाद करतात. जवळच गुरूनाथ हेंदळेकर असतो. तेंव्हा त्याची मिनी बरोबर ओळख झाली आहे. स्वभावदर्शन, तिरकसपणा, लपवाछपवी, नाटयमयता, वेधकता, गतिमानता या वैशिष्टयांनी संवाद नटले आहेत. संवादामधूनच प्रसंगचित्रांची वेधक मांडणी आली आहे आणि बोलके केले आहे.

श्री.नां.च्या 'टेलिफोन' संवादाने कादंबरीची कालबंधने शिथिल झाली. 'आक्टोपस'मध्ये मिनीची थापेबाजी व नंदाजीचा खोटेपणा फोनमुळेच लक्षात येतो हे माध्यम नवीन वापरले आहे. त्याचा वापर विपूल केला आहे. त्यांच्या निवेदनातील टेलिफोन संवादाला समीक्षकांनी नापसंती केली.

श्री.नां.नी 'आक्टोपस' मध्ये वृत्तपत्रातील बातम्यांचा वापर घटनाविश्वाला भडक करण्यासाठी केला तरी तो यापूर्वीही आलेला आहे. हिंदळेकरांची आत्मकथा, पंडित पती-पत्नीचा व हिंदळेकरांचा स्मगलिंगशी जोडलेला संबंध हे सर्व भडक आहे. या भडकपणातून वृत्तपत्रातील जगाची प्रवृत्ती दिसते.

निवेदन पद्धती टाळून श्री.नां.नी पत्र, टेलिफोन, संवाद, वृत्तपत्र यातून 'आक्टोपस' ची निर्मिती केलेली दिसते. एक मित्रमध्ये श्री.ना.पेंडसे म्हणतात. "'आक्टोपस'मध्ये शिरू भाऊंनी मुंबईच्या उच्च माध्यमवर्गीय जीवनातील 'चैतन्य' पकडण्यात अपूर्व यश मिळविले आहे."[41]

वरील विधानाला सत्यता कितपत आहे ते महत्वाचे ठरते. श्री.नां.च्या 'आक्टोपस' मधल्या काही व्यक्तिरेखा पूर्वी भेटलेल्या आढळतात. 'यशोदा' मधील काकांच्या डोळयात धूळ फेकून यशोदा काममग्न होते. तशी मिनीही कामक्रिडेत मग्न होते. कामपिसाट यशोदा अण्णाच्या मिठीत समाधान मानले तर मिनी भावडयाच्या मिठीत समाधान मिळविते. रावजी-राधाप्रमाणे इथे लालजी-मंजूचे वळण येते तर राधा-बापूप्रमाणे मंजू-नंदाजीची पुनरावृत्ती होते.

'आक्टोपस' मधल्या कुटुंबकथेविषयी उषा हस्तक म्हणतात - "'आक्टोपस' ही कादंबरी कामवासनेच्या कोणत्याही रूपाचे सुसंगत, प्रत्ययकारी चित्रण रंगवू शकलेली नाही. खरे तर या कादंबरीची निर्मिती करताना पेंडशांना सातत्याने मोह घालते आहे. ती एक कुटुंबकथा आहे. कुटुंबकथांना आपल्या कादंब-याद्वारे साकार करणे हाच पेंडशांच्या लेखनाचा खराखुरा पिंड आहे. 'आक्टोपस' मध्ये पेंडशांच्या समोर आहे ती मोंडकांची कुटुंब-कथा"[42]

श्री.नां.च्या 'आक्टोपस'मध्ये मानसिकदृष्टया दुरावलेल्या कुटुंबाचे चित्रण येते. लालजी मोडक त्यांची पत्नी मंजू, मुलगी मिनी हया तिघांचे छोटे कुटुंब आहे. पण त्या तिघामध्ये मेळ नाही. हीच खरी शोकान्तिका आहे. त्यासाठी कोणीही व्यक्ति कारणीभूत नाही. त्यांना कामभावनेने एकत्रही आणले व दूरही केले आहे. लालजी मोडक हा प्रसिद्ध चित्रकार आहे. त्याच्याकडे मंजू मॉडेलिंगसाठी येते. तिथेच दोघांचे प्रेमात रूपांतर होते. मंजू गर्भवती होते ती लग्नाच्या अगोदर. मात्र लग्नानंतर लालजी समलिंगी होतो आणि मंजू भावडयाच्या नादी लागते. तिची मुलगी मिनी ही भावडयाच्या नादी लागते. तिला तरूण मुलापेक्षा भावडया योग्य वाटतो. मिनीचा प्रियकर गुरूनाथ हा आत्महत्या करतो. तिच्यासाठी जर्मनीला शिक्षणासाठी जाण्याचे नाकारतो तर दुसरा उपेन हा मिनी व भावडयाचे संबंध पाहतो तेंव्हा ॲटॅक येऊन मरतो. तो ॲटॅक मिनी व भावडयाचे संबंध पाहतो. तेंव्हा त्याला येतो. हे सर्व रहस्य मिनीच्या कामभावनेचे आहे. नंदाजी मोडक उर्फ भैय्या हा लालजीचा भाऊ मोठा आर्किटेक्ट होतो. मंजू त्यालाही नादी लावण्याचा प्रयत्न

करते. त्याची पत्नी इंदू मंजूपासून बाजूला होण्यास सांगते. मात्र नंदाजीला लालजीचे कुटुंब पुन्हा सुरळीत करावे वाटते. मात्र त्यात त्याचा शेवटी पराभव होतो. नंदाजीची व्यक्तिरेखा व्यभिचारात सामील झाली नाही. मात्र इतरांच्या व्यभिचारी जीवनाची झळमात्र लागलेली दिसते.

श्री.नां.च्या 'आक्टोपस' मधील सर्व व्यक्तिरेखा एकाच दिशेने जातात. ती दिशा आहे कामवासनेची. श्री.नां.नी उच्च व मध्यमवर्गाचे 'चैतन्य' पकडण्याचा दावा 'आक्टोपस' मध्ये केला तरी ते कामभावनेचेच दिसते. यापूर्वी 'गारंबीचा बापू' व 'यशोदा' मध्ये यापेक्षा चांगले निवेदन झाले आहे. त्यामुळे श्री.नां.ची 'आक्टोपस' ही कादंबरी अपयशी ठरते. मात्र 'आक्टोपस' मध्ये कोणतीही मध्यवर्ती व्यक्तिरेखा नाही. आशय मध्यवर्ती आहे. या कादंबरीमध्ये तटस्थता राखली आहे. हीच तटस्थता पेंडशांचा नवीन पैलू उलगडण्याचा प्रयत्न करते.

**आकांत**

श्री.नां.ची 'आक्टोपस' नंतरची 'आकांत' ही दहावी कादंबरी 1982 मध्ये प्रसिद्ध झाली. मात्र ती वाड्.मयामध्ये निराशाजनक ठरली. 'आकांत'मधील विषय नाजूक आहे. माणसं एकमेकांच्या आयुष्यात योगायोगाने प्रवेश करतात आणि 'आकांत' मांडतात.

'आकांत'मधील मुकुंदचा मृत्यू कादंबरीमध्ये कथानकाची सुरूवात करतो. या घटनेने मनू-स्वामी, अंजू-रेणू यांच्या जीवनात मूलभूत बदल घडतात. अंजूभोवती असलेली सर्व बंधने गळून पडतात आणि मुकुंदच्या मृत्यूनंतर ती स्वैरपणे जीवन जगू लागते; रेणूला हवा असलेला माणूस मिळतो. मनू व अंजूच्या विक्राळ भितीमुळे स्वामीचं सुखी आयुष्य धोक्यात येते. शेवटी फक्त नाटकीपणा शिल्लक राहतो. अंजू, रेणू, मणू आणि स्वामी या चौघांचेही आयुष्य मुकुंदच्या मृत्यूशी बांधलेले असते. मुकुंदचा मृत्यू ही अपरिहार्य घटना आहे. मृत्यूचे कारण आत्महत्या, अपघात, नैसर्गिक, नैमित्यिक कारण कोणतेही असले तरी दुय्यम ठरते. मुकुंदचा मृत्यू झाला नसता तर या घटनांना अर्थच नव्हता. मुकुंद-अंजू यांचे पटत नव्हते. तिचे वागणेच हट्टी होते. रेणू-स्वामींच्या भेटीला योग्य नाही. मनू व स्वामी एकमेकांमध्ये गुंतले आहेत. मुकुंदची व्यक्तिरेखा त्याच्या मृत्यूनंतरही साकार होताना दिसते.

रविंद्र शोभणे 'आकांत' बद्दल म्हणतात – "एखाद्याचा मृत्यू आणि त्याच्याशी या ना त्या नात्याने संबंधित असणाऱ्या व्यक्तींच्या जीवनात घडणारी स्थित्यंतरे 'आकांत'चा विषय ठरतो."[43]

'मनू' ही 'आकांत' मधील महत्वाची व्यक्तिरेखा आहे. उत्तरार्धाचा विचार केला तर ती नायिकाही होऊ शकेल. मनू ही मानसिकदृष्टया आयुष्यातील एका घटनेने झपाटलेली आहे.

तिच्या वडीलांचे मोलकरणीशी दिवसाढवळया संबंध होते. त्यामुळे तिची आई स्वयंपाक करताना स्वताला पेटवून घेते. मात्र आपला संसार व्यवस्थित ठेवण्याचा प्रयत्न करते. मात्र अंजू आपल्या नव-याला खाणार याची भीती तिला असते. मनूला स्त्री-पुरूष संबंधाबद्धल शिसारी येते. स्वामीला शारीरिक संबंधाचे सुख देऊ शकत नाही. पेंडशांनी गनूचे सुक्ष्म बदल दाखविले. पण कामभावना नष्ट होण्याचे कारण नाही. त्यासाठी वाचकाला अंदाज करावा लागतो. मुकुंदच्या मृत्यूआधीसुद्धा 'मनू" कामभावनेत असमर्थ असल्याचे दिसते.

श्री.नां.नी 'मनू'ची व्यक्तिरेखा माणसिकरूग्ण म्हणून पहिल्यांदाच निर्माण केली आहे. मात्र श्री.नां. तिच्याकडे गांभीर्याने पहात नाहीत. पाहिले असते तर कादंबरीविश्वात श्रेष्ठ व्यक्तिरेखा ठरली असती. मनूचे दुर्दैव तिचा मानसपिता तिच्या खोल अंतरंगातच शिरत नाही. मणूबद्धल सांगताना स्वामी-रेणू, वनिता किंवा मालीला आणून मूळ धागा खंडीत करतात. परिणामी मणूच्या या व्यथेसंबंधी एकसूत्रता न टिकून राहिल्यामुळे तिच्या व्यथेची परिणामकारकता बोथट होते.

श्री.नां.ना 'आकांत' मध्ये कोणत्या व्यक्तिरेखेवर प्रकाश टाकायचा हे स्पष्ट होत नाही. मनूचा स्वामीचा, रेणूचा की वनिताचा 'आकांत' कळत नाही. श्री.ना. व्यक्तिंचा खोलवर विचार न करतानाच दिसतात. 'रेणू' ही स्वामीचा संसार उभा असूनही त्याच्याकडे एंजॉय व शारीरिक सुख घेण्यासाठी जाते. तिला स्वामीला बायको-मुले आहेत. माहीत आहे तरी ती स्वामीच्या कुशीत शिरते. शील, पावित्र्य यासंबंधी तिच्या काही कल्पना, नीतीमूल्येच नाहीत. असलीच तर ती फॅशनच्या दुनियेतील, भोगपातळीवरील आहेत. 'आक्टोपस'मधील मिनी किंवा मंजू प्रमाणे 'रेणू'ची व्यक्तिरेखा दिसते. रेणू व स्वामी दारूच्या नशेत एकत्र येतात. पण दोघेही भविष्यकाळाचा विचार करत नाहीत. पेंडशांची ही नवनिर्मिती आहे काय असाही या दोघाबद्धल प्रश्न उभा राहतो. मात्र त्याचे उत्तर मात्र योग्य नसते. ते निराशाजनकच द्यावे लागते.

कादंबरीमध्ये वनिताची व्यक्तिरेखा उपकथानक म्हणून आली आहे. परंतु तिचा 'आकांत'शी संबंध नाही. वनिता हताशपणे वाण्याची रखेली म्हणून जगू लागते. हुशार मुलाला शिकविण्यासाठी प्रयत्न करते. वनिताला रंगविताना पेंडसे 'रथचक्र' मधील नायिकेमध्ये शिरताना दिसतात. 'आकांत'मधील व्यक्ती कमालीच्या गुळगुळीत बोथट व कपडे बदलून वावरणा-या दिसतात. मालीकडे लक्ष दिले तर ती इकडे तिकडे निरोप देण्यापेक्षा काय करते? वनिता व माली या शोभेकरीताच समाजामध्ये दिसतात. मनूला शाब्दीक सहानुभूती देणारी मावशी आहे. ती एलगार, हद्दपार, गारंबीचा बापू मधील म्हाता-यांच्या प्रमाणेच.

'आकांत'मध्ये श्री.नां.नी ज्या व्यक्तींच्या कथा-व्यथेला हात घातला ती सर्व अनुत्तरीतच ठेवल्या. अंजू ही स्वामीला मिळविण्यासाठी भल्ला बरोबर संबंध ठेवते. पण पेंडसेंनी अंजूची कथा वाढवली नाही. मुकुंदसारख्या एम.ए. झालेल्या नव-याला मान वर करू न देणारी शेवटी तो मेल्यावर स्वामीला मिळविण्याचा प्रयत्न करणारी व भिल्लाबरोबर संबंध ठेवणारी अंजू वनिताऐवजी श्री.नां.नी रंगवायला हवी होती. पण तिचे भिल्लाशी नाते जुळवून प्रकरणावर पेंडसे पडदा टाकतात.

रेणू-स्वामी, मनू-स्वामी बाबतीतही पेंडसे असेच दिसतात. नव-यावर संशय घेणारी मनू पिशाच्च बनते आणि शेवटी स्वामी व मनू यांचा नाटकी संसार सुरू होतो आणि जिथून स्वामी व मनूचा 'आकांत' सुरू होतो. तिथेच कादंबरीचा अंत होतो. मनूची व्यथा जर पेंडशांनी साकारली असती तर यशाची रेघ तरी अपयशाच्या काळया पाटीवरती उमटली असती.

श्री.नां.नी 'एलगार' ते 'रथचक्र' पर्यंत कोकणातील निसर्गावर कादंबरी लेखन केले. मात्र आक्टोपस, लव्हाळी, 'आकांत' मधून मुंबापुरीचे वर्णन केले तरी त्यातील व्यक्ती हया कोकणीच आहेत.

डॉ. रविंद्र शोभणे श्री.नां.च्या 'आकांत' लेखनाबद्दल म्हणतात "कादंबरीच्या कथाबीजापासून तर त्याच्या आकृतीबंधापर्यंत सजगपणे आणि गांभीर्याने विचार करणा-या पेंडशांसारख्या सच्चा कलावंताने 'आकांत'सारखी कृत्रीम, खोटी, नाटकी व अर्धीकच्ची कृती निर्माण करावी आणि आपल्या 'संपलेपणाची' पावती नकळत का होईना, देऊन जावी याचे आश्चर्य वाटण्यापेक्षा खंत वाटते."[44]

## तुंबाडचे खोत

श्री.नां. 'एलगार ते रथचक्र' या कोकणच्या विश्वातून 'लव्हाळी, आक्टोपस व आकांत' मध्ये कोकणाबाहेर गेले. ते पुन्हा कोकणच्या विश्वामध्ये 'तुंबाडचे खोत' या द्विखंडात्मक अकराव्या कादंबरीच्या रूपाने आले 'तुंबाडचे खोत' 1987 मध्ये मे महिन्यात वैशाखीच्या रूपाने प्रसिद्ध झाली. '1358 पृष्ठांची आकाराने मोठी असलेली चार पिढयांचे कथानक सांगणारी' हे या कादंबरीचे वैशिष्टय दिसून येते.

'तुंबाडचे खोत' प्रकाशित झाली त्याच वर्षीचा ग.दि. मांडगुळकर व प्रियदर्शनी अकादमी पुरस्कार मिळाला. श्री.नां.ना या कादबरीचा विषय 1953 मध्ये 'आयणी' या गावापासून

सुचला. पण 'आयणी' चे 'तुंबाड' केले. कालखंड हा 1825 ते 1948 असा 123 वर्षाचा आहे. तो पेशवाईचा अस्त व इंग्रजांची राजवट. 'तुंबाडचे खोत'चा कालखंड म्हणणे योग्य वाटते. तुंबाड व लिंबाडच्या चार पिढयांचा जीवनपट रंगविला आहे. मात्र या चार पिढयांच्या कथेमध्ये मध्यवर्ती असा नायक व नायिका नाही. पिढयामधील बदल मात्र तेथील परिसराच्या पार्श्वभूमीवर येतो. काल्पनिकतेने कथानकाला इतिहासाची मदत झाली. त्यामुळे मूळ कथेलाच अर्थ प्राप्त झाला.

श्री.नां.च्या 'तुंबाडचे खोत'चे थोडक्यात कथानक सांगता येते. शिवाजीराजांनी तुंबाडच्या खोतांचा 1960 मध्ये दाभोळ प्रांत मिळविल्यावर हर्णेचा सिंधूदुर्ग मजबूत केला. तेंव्हा बांडेवाडीमध्ये सत्कार केला. मोरो अंबाजीने तुंबाडची स्थापना केली. भिकाजीपंत खोत तलवार गाजवणारा पुरूष पानिपतमध्ये लंगडा होतो. त्याची खोती परंपरा दादा, बंडू व नाना खोतही तीन मुले चालू ठेवतात. नाना खोत 'शामळू' तर दादा व बंडू यांचा गावामध्ये दरारा होता. खोत मात्र बायांचे षौकी होते. दिसेल ती बाई त्यांचीच. दादा खोताची गोदा ही चौथी बायको. पंढरी पाणक्याची बायको भागी ही दादा खोताची भोगदाशी. पण तिचे बापू न्हाव्याला बोलावून मुंडण करतो.

दादा व बंडू बैराग्याच्या नादी लागून अघोरी उपासना करतात. उपासनेसाठी माणसांच्या कवटया, मानेचे मणके, दारू, बोकडाचे मांस, स्त्रीचा विटाळ, वझेकाका, आचा–याचा नरबळी देऊन गि–हाडीची उपासना फेडतात. मात्र भावांच्या अघोरी उपासनेने नाना खोत लिंबाडला स्थायिक होतो. बंडू गोरे पोलिसांना घाबरून पळतो. दादा खोताला पकडून नेहतात. त्यातच त्याची इभ्रत जाते. झालेल्या मानहानीने अंथरूणावर खिळूण मरण पावतो.

गोदाचे केशवपण होते. पडत्या काळाला सामोरी जाते. मुलाला काशी क्षेत्री पाठवून व्युत्पन्नशास्त्री वैद्य बनवून खोत घराण्याचे वैभव परत मिळविते. गणेशशास्त्री रोग्यांना मोफत तपासतात. पण त्यांची बायको व्रतभंग करते. जनापा, भिकापा–चिमापा (जुळे) बजापा, ताई शास्त्रीबुवांची मुले. जनापा हा व्यवहारशून्य, भिकापा–चिमापा तालुक्याला वखार काढून पैसा मिळवतात. बजापा जुलालीच्या पैशावर सुधारणा करतो. चिमापा बजापाची बायको गंगा हिच्यावर वखारीत बलात्कार करतो. त्याच पापामुळे गंगा होरेत उडी टाकून आत्महत्या करते. जनापाचा मुलगा विश्राम स्वातंत्र्यलढयात सहभागी होतो. चिमापाचा मुलगा अनंता प्रेमात अडथळा आला म्हणून दारू पिऊन झिंगून मरतो. मुलगी तारा ही नव–याच्या घरातून निघून येऊन संताजीशी लग्न करते. बजापाचा मुलगा ओड्डल हा चिमापाच्या विरूद्ध कोर्टात उभा राहतो. पती परागंदा झाल्यामुळे कपाळी सौभाग्य ठेवून ताई सर्वांना धीर देते. गांधीहत्या प्रकरणाने तुंबाडचा वाडा व वखार आगीत भस्म होते.

तुंबाडच्या वंशावळीप्रमाणेच लिंबाडची वंशावळ दिसून येते. लिंबाडचे खोत तुंबाडकरांना मदतीचा हात देणारे आहेत. नाना–मधुकर–नरसू–मधू असा विस्तार आहे. नरसू खोत स्वातंत्र्यलढयात सहभागी होतो. मामलेदार कचेरीवर झेंडा लावताना धारातिर्थी पडतो. नरसूची बायको, मुलगा व सून यांची मने संशयी होतात. अशा पद्धतीने 'तुंबाडचे खोत'चे थोडक्यात कथानक येते.

'तुंबाडचे खोत'ची कथा भाऊसाहेब दिक्षित यांना बाबल्याशेट यांनी सांगितलेली आहे. खरे तर हे बाबल्याशेट तुंबाडकरांच्या घराण्यातले नाहीत. पण त्यांना जी माहिती आहे ती त्यांनी सांगितली आहे. मात्र भाऊसाहेब दिक्षित बंडू खोताचे पणतू असूनही त्याचा बोध मात्र होत नाही.

श्री.नां.च्या 'तुंबाडचे खोत'बद्दल डॉ. रविंद्र शोभणे म्हणतात – "ज्याला आपण फ्लॅशबॅक तंत्र म्हणतो, त्या तंत्राने ही द्विखंडात्मक कादंबरी उभी राहते." पेंडशांच्या इतर कादंब–यांच्या तुलनेने 'तुंबाडचे खोत'चा विचार केला तर यामध्ये अघोरी उपासना, दैवी अद्‌भुतता, दंतकथा, तत्कालीन रूढी परंपरेचे प्रतिबिंब पडलेले दिसते. नरबळी, लिंगपूजा, अंगवस्त्र पाळणे या गोष्टी त्या कालखंडाचे प्रतिनिधीत्व करतात. तथापि संपूर्ण कादंबरीला 'नवलकथा' हे उपशिर्षक देऊन आपली वाट मोकळी करून घेतात."[45]

श्री.नां. 'तुंबाडचे खोत'मध्ये स्वातंत्र्य चळवळ सोडली तर ते नवीन काहीच देत नाहीत. 'एलगार' ते 'रथचक्र' मधील माणसे पुन्हा–पुन्हा वेश बदलून येतात. फक्त 'विश्राम' सारखी एखादी दुसरी व्यक्ति सोडली तर नवीन व्यक्तिरेखा सापडत नाही. पिढीमध्ये बदल करताना ते पहिली पिढी नष्ट करतात. शास्त्रीबुवांच्या पिडीमध्ये खोतांचे तुंबाडकर होते. शास्त्री हे सर्व रोगावर हातखंडा असतात. पण स्वताच्या रोगावर इलाज करणे त्यांना जमत नाही. श्री.नां. शास्त्रीबुवांच्या व्यक्तिरेखेत काळाचा फायदा घेऊनच कपोलकल्पित कथेतील धन्वंतरी उभा करतात.

श्री.नां.च्या 'तुंबाडचे खोत'मध्ये व्यक्तिंना होणारी मुले कधी होतात ते कळत नाही. ती एकदम मोठी होऊनच समोर येतात. अपवाद म्हणून शास्त्रीबुवांचे बालपण दिसते. कथानकाच्या बाबतीतही मागे पुढे असा प्रकार दिसतो. उदाहरण द्यायचे झाले तर नरसू झेंडा लावताना धारातिर्थी पडतो हे अगोदरच्या प्रकरणात येते आणि नंतरच्या प्रकरणात नरसूनेच सर्व योजलेले दिसते. जनापाची व्यक्तिरेखा व्यवहारशून्य व मुखदुर्बळ ठरविली. पण हाच जनापा चिमापाच्या बायकोबरोबर गोठयात संबंध ठेवताना पहावयास मिळतो. बजापा–जुलालीचे प्रेमप्रकरण बाजीराव-मस्तानीचा दाखला देते. मात्र मुळातच ही जुलाली मात्र बनावट वाटते. विश्रामची

व्यक्तिरेखा थोर क्रांतीकारकांची आठवण करून देताना दिसते. 'लव्हाळी'चा अपवाद सोडला तर श्री.नां. प्रथमच 'तुंबाडचे खोत'द्वारे राजकारणाचे चित्रण करताना दिसतात. पण कादंबरीच्या शेवटीही चळवळ महत्वाची ठरताना दिसते.

श्री.नां.च्या 'तुंबाडचे खोत'मधील ताई ही तुंबाडकरांच्या शाळेत शिकविण्यास जाते. खोतांच्या स्त्रीया कधी वाडयाबाहेर पडत नाहीत. मात्र इनामदारांचे विरोधाचे पत्र येऊनही ताई शाळेमध्ये इंग्रजी शिकविण्यास जाते. मात्र ही ताई इंग्रजी कुठे शिकली हे समजू शकत नाही. श्री. नां.नी तिला फक्त श्रेष्ठ बनविण्याचा प्रयत्न केला आहे. खरे तर शाळा हे प्रकरणच या कादंबरीमध्ये नको एवढे आले आहे. त्यामुळे 'हद्दपार'ची आठवण होताना दिसते.

कादंबरी ही चार पिढयांची असली तरी तिसरी पिढीच महत्वाची वाटते. पहिल्या दोन पिढयांमध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक घडामोडी नाहीत. मात्र त्या तिस-या व चौथ्या पिढीमध्ये आहेत. ताईचे लग्न होते तेंव्हा बजापा लहान असतो. मात्र जनापा, भिकापा-चिमापा हे ही लहान दिसतात. मात्र श्री.नां.नी ताईलाच लहान केले आहे. श्रीमती ही ओड्डलची वहिणी. पण तिच्या सासूला तो आजी म्हणतो. नरसूचे व श्रीमतीचे गोठयातील संबंध होते किंवा नाही स्पष्ट केले नाही. तिथेच प्रकरणास बगल दिली.

श्री.नां.ची 'गारंबीचा बापू' रसिकामध्ये गाजली तर त्यांची 'रथचक्र' साहित्यामध्ये गाजली. स्वतः श्री.नां. 'रथचक्र' कलाकृती श्रेष्ठ मानतात. आणि 'मी अजून श्रेष्ठ कादंबरी लिहायची आहे.' असे एप्रिल 1988 च्या ललित दिवाळी अंकात म्हणतात. यातून त्यांचा कादंबरी लेखनाचा प्रवास संपलेला नाही हे स्पष्ट होते.

श्री.नां.च्या लेखनाबद्धल जयंत परांजपे म्हणतात "'गारंबीचा बापू'ची झपाटून टाकणारी बेहोषी आणि 'रथचक्र'चे कलात्मक भान या दोहोचाही समन्वय साधाणा-या कादंबरीची पेंडसे यांचा वाचक वाट पाहात आहे."[46]

श्री.नां.ची 'तुंबाडचे खोत' कादंबरी काही ठिकाणी फसली असली तरी तिचे महत्व नाकारता येत नाही. सुमारे दिडशे व्यक्ती, चार पिढयांचा सव्वाशे वर्षांचा जीवनपट व साडेतेराशे पृष्ठांची कादंबरी लिहिणे मोठे आव्हाण होते. मराठीत आणि सामाजिक कादंबरी बाबतीतला हा प्रयत्न आहे. जीवनाचे आकलन हे सर्वांगानी स्पर्श करणार आहे. चार्वाक, फुले, आंबेडकर, टिळक, म.गांधी, सावरकर यांच्या तत्वज्ञानाला श्री.ना. पहिल्यांदाच स्पर्श करतात. सामाजिक दंगलीचा परिणाम म्हणून तुंबाडकरांची वैभवाची होळी हा 'तुंबाडचे खोत'चा शेवट आहे. ही कादंबरी महान नसली तरी त्यामध्ये मिसळण्यासारखी मात्र आहे.

**गारंबीची राधा**

श्री.नां.ना 'गारंबीची राधा' ही कादंबरी 'गारंबीचा बापू' च्या वेळीच सुचली. तिची निर्मिती मात्र तब्बल चाळीस वर्षानंतर 1993 मध्ये झाली. मात्र 'गारंबीची यशोदा' लिहून झाली. त्याच वेळचा 'गारंबीची राधा'चा विषय त्याच वेळचा. मात्र मध्यंतरीच्या कालखंडामध्ये 'तुंबाडचे खोत' ही द्विखंडात्मक कादंबरी लिहीली. त्यानंतरची 'गारंबीची राधा' ही त्यांची बारावी कादंबरी होय.

श्री.नां.च्या या कादंबरीबाबतचे वेगळेपण दिसते. 'एलगार ते तुंबाडचे खोत' पर्यंतच्या सर्व कादंब-या स्वतः शिरूभाऊंनी लिहिल्या. मात्र 'गारंबीची राधा'साठी त्यांना लेखनिक निवडावा लागला. 'गारंबीचा बापू' ही कादंबरी जिथ संपते तिथून पुढे 'गारंबीची राधा' सुरू होते. 'गारंबीचा बापू' मध्ये येणारा कालखंड स्वातंत्र्यपूर्व आहे. तर 'गारंबीची राधा' मधील कालखंड स्वातंत्र्योत्तर असा आहे. म्हणजे भारताला मिळालेले स्वातंत्र्य या माणसांनी पाहिलेले आहे. 'गारंबीची राधा' ही कादंबरी खोटी वाटते. ती राधेची न वाटता ती बापूचीच व काही प्रमाणात बाळची वाटू लागते. राधा-बापू संबंधाची 'गारंबीचा बापू'तील तीच चौकट बाळ आणि जंगमाच्या बायकोच्या निमित्ताने उभी राहते.

'गारंबीची राधा'च्या प्रस्तावनेत स्वतः श्री.नां. एक वाक्य लिहितात "आपली निर्मितीक्षमता चाळीस वर्षापूर्वी होती तेथेच आहे. व्यक्ती, घटना, प्रसंग पूर्वीच्याच सुलभतेने सुचतात. लेखनाची झिंग पूर्वीसारखीच येते." मात्र श्री.नां.नी 'गारंबीची राधा' लिहून काय साधले? किंवा 'राधा' लिहिलीच नसती तर काय झाले असते? हा प्रश्न 'राधा' वाचताना सतत मनात सलत राहतो. समोर येणारी राधा मुळातच स्मार्ट, तर्ककर्कश आहे; पण यातले तिचे वागणे मात्र हास्यास्पदतेकडे झुकते..

'गारंबीची राधा'चे कथानक पुढील पद्धतीचे दिसते. बापू हा गारंबीचा श्रीमंत व प्रतिष्ठीत झाल्यावर राधा व बापू आपा दामल्यांकडे जातात. दामले दोघांना मुल झाल्यावर त्यांचे लग्न लावून देतात. दामल्यांच्या सल्याने पाचगणीला डॉ. पुंडलिकाकडे बापू-राधा यांचा मुलगा बाळ शिक्षणासाठी जातो. पुढे बापू व त्यांचे घरोब्याचे संबंध होतात. डॉक्टरांचा शरद व बाळ एका वर्गात असतात. दोघे ग्रॅज्युएट होतात. डॉक्टरांची मानलेली मुलगी चंदा हिचे बाळवर प्रेम असते. पण बाळ मात्र तिच्याबरोबर लग्न करण्याचे टाळतो. बाळला मात्र लग्नाच्या व्यवहारावेळी अक्करमाशा व्हावे लागते. पुढे बाळ बापूपेक्षा श्रीमंत व्यापारी होतो. बागुलबुवामुळे बापू अध्यात्मामध्ये जातो. व्याघ्रेश्वराच्या मंदिरामध्ये रात्रंदिवस योगासन करतो. राधा रावजीच्या नावाने हॉटेल सुरू करते.

बाळ व जंगमाच्या बायकोचे प्रकरण त्यामध्ये त्यांना मुल होते. पुढे जंगमच बाळाला त्याच्या बायकोबरोबर लग्न करण्यास सांगतो. तेंव्हा राधाची जंगमाची बायको सून करून घेण्यास हरकत नसते. बापू अधात्मामध्ये भटकंती करतो. मात्र पोटाला उपास पडल्यावर तो परत येतो. मात्र राधा त्याचा स्विकार करते आणि कादंबरीचा शेवट होतो.

श्री.नां.च्या 'गारंबीची राधा' मध्ये आपा दामले, बागुल बुवा, भिकू गुरव, डॉ. पुंडलिक, बाळ, शरद, चंदा, जंगमाची बायको हया व्यक्तिरेखा नवीन चेहरे आहेत. तर 'गारंबीचा बापू' मधील बापू–राधा व दिनकर भट हया व्यक्तिरेखा पुन्हा आल्या आहेत.

श्री.नां.च्या 'गारंबीची राधा' बद्धल डॉ. रविंद्र शोभणे म्हणतात – "प्रत्यक्षात पेंडशांना या कादंबरीत स्वातंत्र्योत्तर काळ चितरायचा आहे. पण कधी–कधी पेंडसे काळाचं भान ठेवताना दिसत नाहीत. काही गोष्टी स्वातंत्र्यपूर्व की स्वातंत्र्योत्तर याचा नीट अदमास लावता येत नाही. काही पूर्व संकल्पित चौकटी मांडून त्यानुसार कथानक खेळवायचे, व्यक्तिंना वागवायचे हा पेंडशांच्या लेखनाचा एक गुणधर्म आहे. हा ठरीव गुणधर्म त्यांच्या बहुतेक कादंब–यांच्या निमित्ताने प्रकट होत असला तरी तो 'तुंबाडचे खोत' पासून अधिक जाणवतो."[47]

श्री.नां. 'गारंबीच्या बापू' नंतर चाळीस वर्षांनी 'राधा' लिहितात. मात्र 'बापू'तून बाहेर येता येत नाही. त्यामुळे मागील गोष्टीच उगळल्या गेल्यासारखे वाटते. बारा गावचे पाणी प्यालेला कर्तबगार बापू बागुलबुवाबर जाणे आणि राधाने पुन्हा रावजीच्या नावाने भजी तळत बसणे हा भागच मुळी कच्चा दिसतो. त्यामुळे श्री.नां.ची ही कादंबरीच पुरी फसत जाताना दिसते आणि 'रथचक्र' आणि 'लव्हाळी' पर्यंतचे श्री.नां. आता राहिलेले नाहीत असेच नाईलाजाने 'गारंबीची राधा' वरून म्हणावे लागते.

**एक होती आजी**

श्री.नां.ची 'एक होती आजी' ही कादंबरी 12 मे 1995 मध्ये प्रकाशित झाली. 'गारंबीची राधा' नंतरची तेराव्या क्रमांकाची कादंबरी आणि त्यांची सध्यातरी शेवटचीच कादंबरी म्हणण्यास काही हरकत नाही. या 'एक होती आजी'चे सुमारे बावीस वर्षापूर्वी 'सुगंध'च्या दिवाळी अंकातून प्रकरण प्रसिद्ध झाले होते. त्याच्या अगोदर 1970 च्या मौज प्रकाशच्या दिवाळी अंकात 'दद्या' चे प्रकरण प्रकाशित झाले होते. मात्र 'दद्या'चा विचार मागे पडून 'एक होती आजी' हया कादंबरीची निर्मिती झाली.

डॉ. रविंद्र शोभणे कादंबरीच्या निर्मितीबद्धल म्हणतात – "चिंतन एका विषयावर करावे आणि तो विषय बाजूला पडून दुस–याच विषयाने आकार घ्यावा हे पेंडशांच्या बाबतीत बहुदा प्रथमच घडले असावे."[48]

श्री.नां.च्या या कादंबरीतील 'आजी' त्यांच्या कुटुंबातील आईच्या अंबुताईच्या चुलतीवरूनच प्रत्यक्षात आली आहे. या कादंबरीचा कालखंड हा स्वातंत्र्योत्तर व स्वातंत्र्यपूर्व असाच आहे. 'एक होती आजी'चे कथानक 'धोकाडया' गावातील नाना कोकणे यांना बारा मुली व पाच मुले असतात. त्यामुळे गावात नाव 'सत–या नाना' हे पडते. नाना भाग्यवान सर्व मुलींची रीतसर मागणीने लग्ने होतात. फक्त 'रंगू' हिचे लग्न अण्णा लिमयेशी होते. त्याचे वय पंचेचाळीस व रंगूचे पंधरा लिमयापैकी दादा लिमये कोकणात राहणारे अण्णा लिमये व श्रीराम लिमये मुंबईमध्ये चाळीत राहणारे अण्णा हे सोनाराच्या पेढीवर काम करणारे. 'रंगू' ही आजी मात्र निपुत्रीक. बल्या हा तिचा भाऊ श्रीमंत होतो. तो डेलिया केरकर या विधवेशी लग्न करतो. श्रीराम लिमयेंची मुल बंडू व हरिराम इंजिनियर होतो. बापाचे घर सोडून समाजसुधारणा करतो. बंडू हा 'ज्ञानेश्वरी' भक्त पण पोकळ. मनी ही मुलगी जातीबाहेर लग्न करते. बंडू मुंबईत लोण्याचा व्यापार करतो. त्याच्यामागे त्याचा मुलगा बाबू हा तोच व्यापार करतो. सोनाराच्या पेढीवरील दागिण्यांची चोरी होते. त्याचा आळ मात्र अण्णावर येतो. त्यातच तो वेडा होवून मरतो. 'आजी' ऐन तारूण्यात विधवा होते. तिचे केशवपण केले जाते. तिचे पुढचे संपूर्ण आयुष्य दुस–यांच्या परोपकारातच जाते. कुणाचे लग्न, बाळंतपण, संसार सजवून थाटून दे, बाबूला चाळीतली जागा देऊन त्याच्या धंद्याचा जम बसवून दे. आणि वयाच्या पंचावणाव्या वर्षी आजी आजारपणात धोकाडयात मृत्यू पावते आणि कादंबरीचा शेवट होतो.

श्री.नां.च्या 'एक होती आजी' या कादंबरीला ठरीव असे कथानक चौकटबद्ध नाही. या कादंबरीचे निवेदन हे प्रथमपुरूषी – तृतीयपुरूषी अशा संमीश्र स्वरूपाचे आहे. वरवर पाहता निवेदन हे पूर्णतः तृतीयपुरूषी वाटते. पण या निवेदनात प्रत्यक्षपणे निवेदकही प्रथमपुरूषी एकवचनासह उभा आहे. या कादंबरीमध्ये साधारणतः पन्नास ते साठ वर्षाचा विस्तृत कालपट आणि त्या कालपटावर जगणारी माणसे हा 'एक होती आजी' चा मुख्य कथाशय.

श्री.नां.ची 'एक होती आजी' ही केवळ व्यक्तिवादी जीवनमूल्यांच्या चौकटीत अडकून पडलेली कादंबरी आहे. संवादाचा क्रम वाचकांना गोंधळात टाकणारा आहे. ही आजी मुळात स्थितिशील, जीवनाविषयी, जगण्याविषयी तिच्या माफक अपेक्षा आहेत. दुस–यांच्या दुःखात आपलं दुःख आणि दुस–यांच्या सुखात आपले सुख मानणारी आजी आहे.

श्री.नां.च्या कादंबरी विश्वामध्ये विधवा बायकांच्या नवरा बायकोंच्या जोडया राधा–बापू, जुलाली–बजापा, बल्या–डेलिया अशा दिसतात.

या कादंबरीमध्ये बल्या–डेलिया, मनी–नितिन देशमुख, सुधा–बाजीराव इत्यादी येणा–या जोडया पाहिल्या तर प्रेमी युगलांचा यशस्वी प्रयत्न यापलीकडे अर्थ नाही.

श्री.नां.ना 'एक होती आजी' चा विषय पावशतकापूर्वी सुचलेला आहे. त्यावेळचे भारतीय जीवन आणि आजचे जीवन यामध्ये फरक आहे. आजच्या दैनंदिन जीवनामध्ये व्यामिश्रतेचा आणि जटील व अनवट अनुभवांचा वेध हे महत्वाचे आहे आणि तेच आजच्या युगाचे आव्हान आहे. या आव्हानामध्ये श्री.नां.ची 'एक होती आजी' बसू शकत नाही. हेच खरे तिचे अपयश आहे.

**श्री.नां.चे नाटयवाड्.मय**

श्री.नां.च्या कादंबरी विश्वाकडून नाटयविश्वाकडे वळले की त्यांनी काही नाटके कादंब–यावरून रूपांतरीत केलेली दिसतात. त्याचप्रमाणे काही स्वतंत्र नाटकेही त्यांनी लिहिली. श्री.नां.नी स्वतः एका लेखामध्ये नाटयनिर्मितीविषयी म्हंटले आहे. "शिरू भाऊंनी 'गारंबीचा बापू' कादंबरी लिहिल्या नंतर नाटक लिहिण्याचे त्यांच्या डोक्यात घट्ट जाऊन बसले होते. चिंतामणराव कोल्हटकरांसारसख्यांनी 'यशोदा'ची प्रशंसा केल्यानंतर नाटयलेखनाच्या बाबतीत त्यांचा आत्मविश्वास वाढला. तेव्हापासून 'नाटयलेखन' त्यांच्या पायात तडमउत आले आहे." मामा वरेरकरांनी श्री.नां.च्या नाटयलेखनाची प्रशंसा केली आहे. "कादंबरी आणि नाटक हयांच्या लेखनाचा तुझा क्रम चुकला आहे. आता कादंबरीकडून नाटकाकडे वळताना तुला फार प्रयास पडणार." या उदाहरणावरूनच श्री.नां.च्या स्वतंत्र व रूपांतरीत नाटकामध्ये यशापयश दिसते. श्री.नां.नी नाटयसृष्टीमध्ये 'शोनार बांगला' हे अप्रकाशित नाटक सोडले तर एकूण नऊ नाटके लिहिली. मात्र त्यांना 'गारंबीचा बापू' या रूपांतरीत व 'संभुसाच्या चाळीत' या स्वतंत्र अशा दोनच नाटकांनी प्रायोगिकतेच्या यशोशिखरावर नेहले. मात्र बाकीची सर्व नाटके अयशस्वीच ठरतात.

श्री.नां.च्या नाटयलेखनामध्ये रूपांतरीत व स्वतंत्र नाटके असे दोन प्रकार दिसून येतात. श्री.नां.ची रूपांतरीत नाटके.

**यशोदा**

श्री.नां.चे 'यशोदा' हे पहिले नाटक 'रंगायण' कलामंचने रंगभूमीवर सादर केले. त्याला विजया मेहंताचे दिग्दर्शन व अभिनय लाभला. डॉ. श्रीराम लागू यांच्या अभिनयाने प्रयोग

देखना झाल्याचे श्री.नां.नी सांगितले तरी हे नाटक यशस्वी झाले नाही. श्री.नां.नी हे नाटक 'यशोदा' कादंबरीच्या अगोदर लिहिले मात्र ते 'यशोदा' प्रसिद्ध झाल्यानंतर रंगभूमीवर आले. त्यामुळे ते रूपांतरीत नाटक आहे असे वाटते. पण ते रूपांतरीत नाही. नाटकामध्ये विठोबा, यशोदा, अण्णा खोत, बापू, काका पैकी कोणतेच पात्र उठावदार ठरले नाही. त्यामध्ये व्यक्तिरेखांचा गौरव कुठेच नाही. जरी चार अंकी नाटक असले तरी ते मोठया एकांकीकेसारखे वाटते. 'यशोदा' हे नाटक ज्याने 'गारंबीचा बापू' ही कादंबरी वाचली आहे. त्यालाच ते समजेल असे मत स्वतः श्री.नां.नीच दिले. त्यामुळे हे असफल नाटक ठरते.

**राजे मास्तर**

श्री.नां.च्या 'हद्दपार' कादंबरीचे रूपांतर 'राजे मास्तर' नाटक होय. नाटकाची सुरूवात ही निवेदनाची असल्याने नाटयहाणी झाली आहे. आईने फळयावर कोयतीचे चित्र काढूनच नाटकाची सुरूवात आहे. पुढे नन्नूचा ताप, निर्मल प्रकरण, मास्तर व दिपोटीचे भांडण आणि पहिल्या अंकाच्या शेवटी आईशी भांडण करून मास्तर काश्याच्या मदतीसाठी जातात. हेच पदर दुस—या, तीस—या व चौथ्या अंकात येतात. नन्नू जग सोडून जातो, निर्मलचा लढा यश, अपयश घेतो. मास्तर राजीनामा देतात आणि कोयती बाहेर काढण्याची भाषा करतात. शेवटी आई व मास्तर एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करतात. आणि पडदा पडतो. जीव लागावा असे क्षण येत नाहीत. त्यामुळेच 'राजे मास्तर' कोसळते.

**गारंबीचा बापू**

श्री.नां.चे हे रूपांतरीत नाटक प्रायोगिक यश मिळवून गेले. या नाटकामध्ये कादंबरीतील 'संविधानक' घेतले नाही. मात्र नाटकाला 'गारंबीचा बापू' हे नाव त्यामध्ये गारंबीचे दर्शन आले नाही तरी दिले. खरे पाहतां 'राधेचा बापू' हे नाव योग्य वाटते. विठोबा, यशोदा, बापू, दिनकर, अण्णा खोत, राधा, रावजी, बाबू ही पात्रे येतात. पण ती कादंबरीतील रूपे न घेता वेगळीच रूपे घेऊन येतात. या नाटकाच्या यशाचा वाटा प्रायोगिकता आणि काही कादंबरीच्या लोकप्रियतेचा असावा. कादंबरीतील काही गुणही नाटकामध्ये उतरले. त्यामुळे यशस्वी कादंबरीप्रमाणे यशस्वी नाटक ठरते.

**असं झालं आणि उजाडलं**

श्री.नां.नी 'लव्हाळी' या कादंबरीचे रूपांतर या नाटकात केले. रोजनिशीतून 'लव्हाळी' निर्माण झाली. त्यात मध्यम वर्गीयांचे जीवन रेखाटले तरी कथेला प्राधान्य नव्हते. मात्र नाटकामध्ये कथेला प्राधान्य महत्वाचे ठरते. नाटकामध्ये कथेला महत्व दिले. सर्वोत्तम व त्याच्या मित्रांची आणि नातेवाईकांची कथा घेतली आहे. 1967 ला रंगभूमीवर आलेले 'संभुसांच्या चाळीत' हे स्वतंत्र नाटक. श्री.नां.नी लगेच दुसरे नाटक रंगभूमीवर आणण्याचा प्रयत्न केला. आणि चाळ जीवनावरील दुसरे नाटक इ.स. 1969 ला 'असं झालं आणि उजाडलं' हे रंगभूमीवर आले. मात्र ते प्रायोगिकदृष्टया अपयशीच ठरले.

**रथचक्र**

श्री.नां.चे 'रथचक्र' हे नाटक 'रथचक्र' या कादंबरीच्या रूपांतरातून 1980 मध्ये रंगभूमीवर आले. मात्र ते श्री.नां.ना 'गारंबीचा बापू'प्रमाणे यशाच्या प्रायोगिकतेकडे नेहू शकले नाही.

**श्री.नां.ची स्वतंत्र नाटके**

**महापूर**

श्री.नां.चे हे पहिले स्वतंत्र नाटक असले तरी त्याची रचना चार अंकी आहे. कथा, संवाद, व्यक्तिचित्रे यापैकी कोणतीच गोष्ट मनाची पकड घेऊ न शकल्याने 'महापूर' हे नाटक प्रायोगिकदृष्टया असफल ठरले आहे.

**संभुसाच्या चाळीत**

श्री.नां.चे 'संभुसाच्या चाळीत' हे दुहेरी यश मिळविणारे स्वतंत्र नाटक आहे. त्यातील प्रायोगिकतेएवढाच जीवनानुभव प्रेक्षकांना आवडला. यातील जीवनानुभव हा व्यक्तिरेखाटनात दिसतो. कथानक आढळत नाही. चाळीत राहणा-या पमा व पद्माकर हे प्रेमविवाह करणारे जोडपे त्याच्यात संशयी वादळ निर्माण होवून या वादळाची गौड अखेर असे सर्वसामान्य कथानक आले आहे. त्यांच्या जोडीला चंदू नावाच्या खटपटी व लटपटी तरूणाची धडपड आहे. मात्र नाटकामध्ये चाळीतील सर्व व्यक्तिरेखा जीवंत वाटतात.

13369
A

श्री.नां.नी पस्तीस पात्रांच्या व्यक्तिरेखेतून चाळीचे जीवन न अडखळता केले हे खास वैशिष्टय पमा, पद्माकर, चंदू बरोबर कर्तव्यदक्ष मोना व मिस्किल काका, डिग्रजर शेजारी अशीच इतरही पात्रे आपले व्यक्तिमत्व घेऊन येतात. चाळ जीवनाचे वास्तव वातावरण येते. येथे भांडणारे व प्रसंगी मदत करणारे चाळकरी हे विश्व मोठया सहजतेने टिपले आहे. त्यामुळे 'संभुसाच्या चाळीत' हे नाटक प्रायोगिक व व्यावसायिक दृष्टीने यशस्वी ठरले.

**चक्रव्यूह**

श्री.नां.चे 'चक्रव्यूह' हे स्वतंत्र नाटक 1970 ला रंगभूमीवर आले. त्यांनी रंगभूमीकरीताच हे नाटक लिहिले. अनेक सत्य घटना या नाटकात आल्या. अनुभव अस्सल असूनही कलात्मक मांडणीतील अस्सलपणा गमविला आहे. प्रवेशी रचना नाटकाच्या रसास्वादात अडथळे आणते. गतीमानता प्राप्त होत नाही. पात्रांचा स्वभाव रेखाटताना स्वाभाविकतेच्या ऐवजी नाटकीपणा दिसतो. भाषाशैली नाटकी बनते. त्यामुळे नाटक वाचनीय बनते. मात्र ते प्रेक्षनीय बनू शकले नाही.

**पंडित। आत तरी शहाणे व्हा।**

श्री.नां.चे स्वतंत्र नाटक पहिला अंक विनोदी तर दुस–या अंकात गांभीर्य आहे. त्यात झोपडपट्टीचा विषय आहे. परंतु वेदनासह डोळयासमोर येत नाही. त्यामुळे तो उपराच राहतो. आणि कथानक घडते. पंडितच्या मध्यमवर्गीय घरातच. आणि पंडिताच्या मध्यमवर्गीय अपत्यांच्या तडजोडीतूनच नाटक संपते. झोपडपट्टीसारखा विषय घेऊनही कोकण जीवनात जाऊ शकत नाही. त्यामध्ये करमणूकप्रधान एवढीच जमेची बाजू दिसते. आणि प्रायोगिकदृष्टया अपयशी ठरते. श्री.नां.चे 'डॉ. हुद्दार' हे 1986 मध्ये रंगभूमीवर आले मात्र तेही अपयशीच ठरले.

**शोनार बांगला**

श्री.नां.चे 'शोनार बांगला' हे स्वतंत्र नाटक. कथेच्या दृष्टीनेही ते स्वतंत्रच होते. या नाटकाचे प्रयोग झाले. मात्र ते पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले नाही. त्याचे लेखन 1972 मध्ये झाले.

श्री.नां.चे 'नाटयदशक' अशा पद्धतीचे असले तरी त्यांची प्रायोगिक क्षमता प्रकट मात्र झाली नाही. त्यांना यशाच्या शिखरावर फक्त दोन नाटके नेहू शकली. त्यामुळे मराठीमध्ये श्री.नां.ची दखल घ्यावी लागते ती 'कादंबरीकार' म्हणूनच.

**श्री.नां. पेंडसे यांचे इतर वाङ्मयीन लेखन**

**श्री.नां. पेंडसे : लेखक आणि माणूस। एक मित्र।**

श्री.नां. हे खरे प्रयोगशिल लेखक दिसतात. 'श्री.नां. पेंडसे : लेखक आणि माणूस। एक मित्र।' 'आक्टोपस' पर्यंतच्या सर्व कादंब–यांची वैशिष्टये या पुस्तकातून आली आहेत. श्री.ना. व त्यांच्या लेखनाच्या संबंधकुतुहलातूनच या आत्मचरित्राचा जन्म झाला आहे. आणि पुनः प्रत्ययाच्या विश्वात माणसांची अनेक रूपे आली आहेत.

श्री.नां. पेंडसे यांचे लेखन हे माणसांच्या शोधातूनच आले आहे. त्यांच्या लेखनाचा प्रारंभच व्यक्तिचित्रणातून झाला आहे. त्यामुळे त्यांनी लेखक, माणूस व मित्र यांचे दर्शन या पुस्तकातून घडविले. त्यामध्ये कुटुंब, मित्र, समीक्षक, साहित्यिक, नट, नाटककार, कलावंत अशा असंख्य व्यक्तिरेखाटनातून आत्मचरित्र आले आहे. त्यात व्यक्तिमत्वाचा पीळ व बळ दिसून येते.

श्री.नां.च्या 'श्री.ना. पेंडसे लेखक आणि माणूस। एक मित्र।' या लेखनामध्ये एक मित्र म्हणून 'वामन' आला तरी त्यांनी स्वतः लेखन केले आहे. व्यक्तिचित्रे, निसर्ग, प्रसंग, संवाद आणि पेंडसे शैली ही सारी वैशिष्टये येतात. त्यामुळे या आत्मचरित्रात्मक पुस्तकाचे तीन गट दिसतात. ते म्हणजे आत्मचरित्र +- चरित्र + कादंबरी. यामध्ये 'अंबूताईची आत्मकथा', पत्रलेखन, दैनंदिनीतील उतारे यातून कादंबरीचा विकास होतो. 'खडकावरील हिरवळ' मधून 'राजे मास्तर' व 'बापूकाका सामल' यांच्या व्यक्तिरेखा आणि विं.दा.ची गझलही घेतली आहे.

श्री.नां.च्या या पुस्तकामध्ये एकूण आठ विभाग आहेत. त्यातील चौथ्या विभागामध्ये जगप्रवासाचे वर्णन आले आहे. श्री.नां.नी जीवन व साहित्य या दोहोंची चरित्र आत्मचरित्राबरोबरच समीक्षा केली आहे. त्यामुळे हा समीक्षा ग्रंथही ठरतो. त्यांनी स्वतःचेच संशोधन येथे केले आहे. श्री.नां.च्या या पुस्तकामुळे मराठी आत्मचरित्रात एक मोलाची भर पडलेली दिसते.

**जुम्मन**

'जुम्मन' हा कथासंग्रह श्री.नां.नी 1966 मध्ये लिहिला. त्यामध्ये एकूण सहा कथा आहेत. त्यास श्री.नां.नी लघुकथा म्हंटले आहे. 'हिरोकोसाण' या कथेमध्ये तानाझाकी यांच्या कादंबरीचा सारांश घेतल्याचे मान्य करतात. 'जुम्मन' आणि 'डोह' मध्ये कोकणप्रदेश आणणारे प्रादेशिक कादंबरीकार दिसतात. 'रामशरणची गोष्ट', 'धर्मशाळा' व 'गणू व गणूची बायको' या कथात

शहरी वातावरणाचा अविष्कार दिसतो. श्री.नां.नी कथालेखनाविषयी फाफटपसारा व अपघाती मत मांडले आहे हे यातून स्पष्ट होतो.

श्री.नां.चे इतर वाङ्.मय पाहायचे झाले तर त्यांनी भाषांतरीत केलेली 'प्रायश्चित्त' नावाची कादंबरी व 'बेस्ट उपक्रमाची कथा' या नावाचे पुस्तक त्यांनी बेस्टमध्ये नोकरीस असताना लिहिले. त्याबरोबरच त्यांनी नियतकालीकामध्ये अपवादात्मक लेखन केले आहे. श्री.नां.चे 'एक मुक्त संवाद उधाच्या कादंबरीकाराशी' हे समीक्षात्मक पुस्तक 1995 मध्ये प्रकाशित झाले.

श्री.नां.च्या वाङ्.मयीन लेखनाचा आढावा वरील प्रमाणे वेगवेगळया वाङ्.मयीन लेखनातून पाहावयास मिळतो.

## – संदर्भ ग्रंथ –


| | पुस्तकाचे नांव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| 1) | श्री.नां. पेंडसे, लेखक आणि माणूस।एम मित्र। | श्री.नां. पेंडसे | 96 |
| 2) | – " – | – " – | 106 |
| 3) | – " – | – " – | 126 |
| 4) | – " – | – " – | 133 |
| 5) | मराठी कादंबरी पहिले शतक | कुसुमावती देशपांडे | 206 |
| 6) | श्री.नां. पेंडसे, लेखक आणि माणूस।एक मित्र। | श्री.नां. पेंडसे | 101 |
| 7) | आधुनिक मराठी वाङ्‌मयाचा इतिहास भाग दोन | अ.ना. देशपांडे | 193 |
| 8) | मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा | चंद्रकांत बांदिवडेकर | 63 |
| 9) | खडक आणि पाणी | गंगाधर गाडगीळ | 332 |
| 10) | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास | बापट/गोडबोले | 315 |
| 11) | खडक आणि पाणी | गंगाधर गाडगीळ | 332 |
| 12) | मराठी कादंबरी पहिले शतक | कुसुमावती देशपांडे | 190 |
| 13) | मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा | चंद्रकांत बांदिवडेकर | 65 |
| 14) | आधुनिक मराठी वाङ्‌मयाचा इतिहास भाग दोन | अ.ना. देशपांडे | 192 |
| 15) | श्री.ना. पेंडसे, लेखक आणि माणूस।एक मित्र। | श्री.ना. पेंडसे | 159 |
| 16) | मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा | चंद्रकांत बांदिवडेकर | 66 |
| 17) | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास | बापट/गोडबोले | 316 |
| 18) | खडक आणि पाणी | गंगाधर गाडगीळ | 342 |
| 19) | आधुनिक मराठी वाङ्‌भयाचा इतिहास भाग दोन | अ.ना. देशपांडे | 192 |
| 20) | मराठी कादंबरी पहिले शतक | कुसुमावती देशपांडे | 192 |
| 21) | मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा | चंद्रकांत बांदिवडेकर | 74 |
| 22) | धार आणि काठ | नरहर कुरूंदकर | 188 |
| 23) | मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास | बापट/गोडबोले | 316 |
| 24) | धार आणि काठ | नरहर कुरूंदकर | 212 |
| 25) | खडक आणि पाणी | गंगाधर गाडगीळ | 338 |
| 26) | श्री.ना. पेंडसे, लेखक आणि माणूस।एक मित्र। | श्री.ना. पेंडसे | 421 |


LIBRARY

| | | | |
|---|---|---|---|
| 27) | श्री.ना. पेंडसे, लेखक आणि माणूस।एक मित्र। | श्री.ना. पेंडसे | 295 |
| 28) | धार आणि काठ | नरहर कुरूंदकर | 194 |
| 29) | श्री.ना. पेंडसे,लेखक आणि माणूस।एक मित्र। | श्री.ना. पेंडसे | 414-15 |
| 30) | - " - | - " - | 182 |
| 31) | मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा | चंद्रकांत बांदिवडेकर | 82 |
| 32) | - " - | - " - | 86 |
| 33) | - " - | - " - | 92 |
| 34) | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास | बापट/गोडबोले | 318 |
| 35) | श्री.ना. पेंडसे,लेखक आणि माणूस।एक मित्र। | श्री.ना. पेंडसे | 422 |
| 36) | मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा | चंद्रकांत बांदिवडेकर | 98 |
| 37) | कादंबरी आणि मराठी कादंबरी | उषा हस्तक | 318 |
| 38) | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास | बापट/गोडबोले | 319 |
| 39) | श्री.ना. पेंडसे,लेखक आणि माणूस।एक मित्र। | श्री.ना. पेंडसे | 424 |
| 40) | मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा | चंद्रकांत बांदिवडेकर | 102 |
| 41) | श्री.ना. पेंडसे,लेखक आणि माणूस।एक मित्र। | श्री.ना. पेंडसे | 425 |
| 42) | कादंबरी आणि मराठी कादंबरी | उषा हस्तक | 365 |
| 43) | कादंबरीकार श्री.ना. पेंडसे | डॉ. रविंद्र शोभणे | 111 |
| 44) | - " - | - " - | 115 |
| 45) | - " - | - " - | 119 ते 121 |
| 46) | श्री.ना. पेंडसे : हस्तलिखित आणि परिष्करणे | जयंत परांजपे | 144 |
| 47) | कादंबरीकार श्री.ना. पेंडसे | डॉ. रविंद्र शोभणे | 198-99 |
| 48) | - " - | - " - | 202 |


- 000 -